१.

२. **व्दीपसागर इत्यादि-** यात घातकीखंड व्दीप, कालोद समुद्र, पुष्कर व्दीप यांच्या वर्णनाबरोबरच सात पृथ्वी त्यात स्थित भवनवासी व व्यंतर देव, नरकात उत्पन्न होणारे तिर्यंच व नंतर वैमानिकांची माहिती दिली आहे.

३. **ज्योतिषपटल-** या उद्देशात चंद्र-सूर्य ज्योतिषी देवांचे वर्णन आहे.

४. **प्रमाणभेद-** यात समय, आवली या कालमानाबरोबरच परमाणु, त्रसरेणु, क्षेत्रमान यांचे विवेचन आहे. प्रत्यक्ष व परोक्षरुप प्रमाण भेदांची चर्चा केली आहे. शेवटी मनुष्यक्षेत्र, यमकादि पर्वत, जंबू वृक्ष,वन, भोगभूमि, नदी यांच्या संख्येचा उल्लेख करुन सर्वात शेवटी स्वत:विषयीची माहिती दिली आहे. हा ग्रंथ भाषादृष्ट्या जरा शिथिल व पुनरुक्तीने युक्त असलेला दिसतो.

दिगंबर परंपरेप्रमाणेच या विषयावर श्वेतांबर संप्रदायातील सूर्य-चंद्र-जंबूव्दीप प्रज्ञाप्ति या तीन आगम ग्रंथाशिवाय जिनभद्रगणींनी रचलेले क्षेत्रसमास व संग्रहणी हे दोन ग्रंथ प्रसिध्द आहेत. या दोन्ही ग्रंथात हळूहळू वाढ होऊन त्यावर टीकाकारांनी लघु व बृहद् अशी संस्करणे तयार केली आहेत. बृहत् क्षेत्रसमास (त्रैलोक्यदीपिका) मध्ये जंबूव्दीप, लवणोदधि, घातकीखंड, कलोदधि, पुष्करार्ध हे पाच अधिकार असून त्यात ६५६ गाथा आहेत. बृहद् संग्रहणी हेमचंद्रसूरीचे शिष्य चंद्रसूरी यांनी १२ व्या शतकात लिहिली आहे. त्यात देव, नरक, मनुष्य, तिर्यच या चार अधिकाराचे वर्णन केले आहे. एकूण गाथा संख्या ३३४९ आहे. यात लोकरचनेपेक्षा तेथे राहणा-या जीवांचे वर्णन अधिक विस्ताराने केले आहे.

**लघुक्षेत्रसमास, बृहतक्षेत्रसमास व विचारसार प्रकरण-**

**लघुक्षेत्रमास-** या ग्रंथाची रचना नत्नशेखरसूरि यांनी १४व्या शतकात केली असून, त्यांनीच त्यावर षडावश्यकवृत्तीची रचना केली आहे. यात एकूण २६२ इतक्या गाथा असून त्यावर स्वोपज्ञ वृत्ति देखील आहे. या ग्रंथात २।। व्दीपांचे वर्णन केले आहे. आजकाल या ग्रंथाचा प्रसार अधिक प्रमाणत होऊ लागला आहे. बृहत् क्षेत्रमास या ग्रंथाची रचना

तिलकसूरिनी १४ व्या शतकात केली असून त्यातहि अडीच व्दीप प्रमाण मनुष्य लोकांचे वर्णन केले आहे. त्याच दरम्यान 'विचारसार प्रकरण' हे देवसूरिशिष्य प्रद्युम्नसूरि यांनी लिहिले असून, यामध्ये कर्मभूमी, भोगभूमी, आर्य-अनार्य देश, राजधान्या, तीर्थकरांचे पूर्वभव, मातापिता, स्वप्न, जन्म, समवसरण, गणधर, अष्टमहाप्रातिहार्य, कल्की शक व विक्रम पध्दतीची कालगणना, दहा निन्हव, ८४ लाख योनि, सिध्द अशा विविध विषयांचे वर्णन केले आहे.

**ज्योतिषकरण्डक-** करणानुयोगातील हा एक उत्कृष्ट ग्रंथ असून वरील सर्व ग्रंथापेक्षा हा प्राचीन असावा असे दिसते. या ग्रंथकर्त्याचे नाव मात्र अज्ञात आहे. या ग्रंथात २१ अधिकार असून त्यात ३७६ गाथा आहेत. या ग्रंथावर पादलिप्तसूरींची टीका असल्याचा उल्लेख आहे. या ग्रंथामध्ये कालप्रमाण, मान, मासभेद,वर्षभेद, दिन, तिथीचे प्रमाण, परमाणूचे स्वरुप, चंद्रसूर्याची संख्या, चंद्राची वृध्दि हानी, नक्षत्रांची माहिती, चंद्र सूर्य नक्षत्र यांची गति, आवृत्ति, मुहूर्तगति, ऋतु, ताप, प्रणष्टपर्व व पौरुषी या विविध विषयांची माहिती दिली आहे. करणानुयोगातील वरील विविध ग्रंथाशिवाय संस्कृत व अपभ्रंश भाषेतील काही ग्रंथांच्यामध्ये देखील त्रिलोकाविषयीचे वर्णन आले आहे. त्यापैकी हरिवंशपुराण, महापुराण, त्रिषष्टिशलाकापुरुषचरित्र, त्रिषष्टीमहापुरिस गुणालंकारु इत्यादि ग्रंथ महत्वाचे असून, प्राचीनता व विषयविस्ताराच्या दृष्टीने जिनसेनकृत संस्कृत हरिवंशपुराण (८ वे शतक) विशेष उल्लेखनीय आहे. त्यातील ४ ते ७ सर्गापर्यत क्रमाने अधोलोक, तिर्यकलोक, ऊर्ध्वलोक, काल यांचे वर्णन विस्तृत विवेचन केले आहे.

करणानुयोगातील हे विविध जैन साहित्य भारतीय साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून, त्यात गणना करण्यासाठी वापरलेल्या गणित शास्त्रावरुन विविध प्रकारच्या तत्कालीन प्रमाणांची माहिती आपणाला मिळू शकते. याच माहितीच्या आधारे आधुनिक विश्वातील अज्ञात अशा काही गोष्टींची माहिती घेणे सुध्दा शक्य आहे.

## चरणानुयोग साहित्य

चरणानुयोग साहित्यामध्ये आचरणविषयक गोष्टींचे विवेचन केले आहे. त्यात गृहस्थधर्म, मुनिधर्म, त्यांचे नियम, उपनियम, आचार-विचार यांची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. व्दादशांग आगमातील आचारांग व उपासकाध्ययन हे ग्रंथ त्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. आचारांग सूत्रामध्ये मुनिधर्माचे वर्णन सुंदर रितीने केले असून तो एक प्राचीन ग्रंथ मानला जातो. याउलट उपासकाध्यनामध्ये गृहस्थांचा आचार कसा असावा या विषयी माहिती दिली आहे. श्वेतांबर संप्रदायानुसार चरणानुयोगात कलिकाश्रुताचा समावेश करण्यात आला आहे. प्रामुख्याने आचार म्हणजे आपल्या शक्तिनुसार निर्मळ केल्या गेलेल्या सम्यग्दर्शनादिसाठी जो प्रयत्न केला जातो त्याला आचार म्हणतात. आचाराचे सम्यग्दर्शनाचार, ज्ञानाचार, तपाचार, वीर्याचार असे विविध भेद सांगितले आहेत.

या आचार धर्माची माहिती आपणाला आगमोत्तर ग्रंथाशिवाय इतरही काही ग्रंथातून मिळते. हे ग्रंथ संस्कृत, प्राकृत, अपप्रभ्रंश इत्यादि विविध आचार्याकडून लिहिले गेले आहेत. सर्वसाधारणपणे आचारविषयक ग्रंथाचे आपणाला पुढीलप्रमाणे विभाजन पाडता येईल. १. मुनि आचारविषयक प्राकृत ग्रंथ, २. मुनि आचारविषयी संस्कृत ग्रंथ ३. श्रावकाचाराविषयीचे प्राकृत ग्रंथ ४. श्रावकाचाराविषयीचे संस्कृत अपभ्रंश ग्रंथ. प्रथम विभागामध्ये आपणाला महान दिगंबर आचार्य कुंदकुंदाचार्य यांचे प्रवचनसार, नियमासार, दशभक्ति,अष्टपाहुड, रयणसार, वट्टकेरस्वामीकृत मूलाचार, शिवार्यकृत भगवती आराधना, हरिभद्र सुरींचा पंतत्थुग, देवसूरिकृत जीवानुशासन, नेमिचंद्रसूरिकृत प्रवचन-सारोध्दार या ग्रंथाच समावेश करता येईल. मुनि आचारविषयक संस्कृत ग्रंथात आपणाला उमास्वातीकृत प्रशमरति प्रकरण, चामुंडरायकृत चारित्र सार उर्फ भावनासारसंग्रह, अमृतचंद्र सूरिकृत पुरुषार्थसिध्युपाय, वीरनंदीरचित आचारसार या ग्रंथाचा उल्लेख करता येईल.

श्रावकाचार प्राकृत ग्रंथामध्ये सावयपण्णत्ति, हरिभद्रकृत पंचासग, वीस-वीसीओ, शांतिसूरिकृत धर्मरत्न प्रकरण, वसुनंदिकृत उपासकाध्ययन, सावयधम्मदोहा (अपभ्रंश) हे ग्रंथ समाविष्ट करता येतील. तर श्रावकाचाराविषयी संस्कृत ग्रंथामध्ये रत्नकरण्ड-श्रावकार, यशास्तिलकचंपू, अमितगतिकृत श्रावकाचार, आशाधरकृत सागारधर्मामृत, गुणभूषणकृत श्रावकाचार यांचा सामावेश होऊ शकेल.

**मुनि आचारविषयक प्राकृत ग्रंथ-**

मुनी व श्रावकांच्या आचारविषयीची माहिती सर्वप्रथम आपणाला आ. कुंदकुंदांच्या ग्रंथातून व्यवस्थितपणे पाहावयास मिळते. आचार्य कुंदकुंद हे दिगंबर जैन संप्रदायातील एक अत्यंत महान व श्रेष्ठ असे आचार्य मानले जातात. त्यांनी आपल्या ग्रंथातून आचार, विचार, सिध्दांत, तात्विक चर्चा या विविध गोष्टींची माहिती दिली आहे. नियमसार, प्रवचनसार तथा रयणसार या त्यांच्या ग्रंथांना रत्नत्रयी असे मानले जाते. प्रवचनसार ग्रंथातील तिसरा श्रुतस्कंध म्हणजे मुनि आचारवरील एक स्वतंत्र रचनाच होय. इतर ग्रंथातूनही त्यांनी आचारांचे वर्णन केले आहे.

१. **प्रवचनसार-** मुनि तथा साधु धर्माचे विवेचन करणारा आचार्य कुंदकुंदाचा प्रवचनसार हा एक सर्वोत्तम ग्रंथ मानावा लागेल. या ग्रंथातील तिस-या श्रुतस्कंधामध्ये ७५ गाथांच्या साह्याने आचारधर्माचे वर्णन करण्यात आले आहे. पूर्णतः आसक्तिविरहित राहणे हेच खरे मुख्य ध्येय आहे. अंतर्गत व बहिर्गत शुध्दता प्राप्त करणे हेच साधूचे चिन्ह आहे. शुध्द अन्नाचे ग्रहण करणे, पापाबद्दल क्षमा मागणे, आपल्या व्रताचरणामध्ये एकाग्र होणे, इतर ज्ञानी साधूंच्या संगतीत राहणे, स्त्रीसंसर्ग टाळणे व सतत मोक्षावर पूर्णतः लक्ष ठेवणे ही मुनीची आद्य कर्तव्ये आहेत. मुनींनी ज्ञान, दर्शन, चारित्र्य, तप, वीर्य या पंचरत्नांनी युक्त असावे. मी कोणाचा नाही व दुसरे कोणी माझे नाहीत असा निश्चय करावा.

प्रवचनसार ग्रंथात वरील आचरणाशिवाय श्रमणाचे लक्षण, प्रव्रज्या, उपस्थापनात्मक दीक्षा, अठ्ठावीस मूलगुण, दीक्षाछेद, उत्सर्ग व अपवादमार्ग, ज्ञानसाधना, उपयोग, संयमविरोधी प्रवृत्तीचा निषेध, श्रामण्यपूर्तिरुप मोक्षतत्वाची साधना इत्यादि गोष्टींचे विवेचन केले आहे. मुनीच्या बाबतीत पंचमहाव्रते, पाच समिती, तीन गुप्ति, मूलगूण यांचे यथायोग्य आचरण करणे अत्यावश्यक सांगितले आहे.

२८ मूलगुणामध्ये पाच महाव्रते (अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य, असंग्रह) पाच समिती (ईर्या,एषणा, भाषणा, आदाननिक्षेपण, उत्सर्ग), पाचइंद्रियदमन, केशलोच, सहा आवश्यक क्रिया, चतुविशतिस्तवन, प्रतिक्रमण, कायोत्सर्ग,प्रत्याख्यान, नग्नत्व, अस्नान, भूमिशयन, दात न घासणे, उभे राहून भोजन घेणे, दिवसातून एक वेळ आहार घेणे, वगैरे बाबींचा विचार करण्यात आला आहे. उपयोगामध्ये शुभोपयोग, अशुभोपयोग आणि शुध्दोपयोग या तीन बाबींची माहिती दिली आहे. थोडक्यात मुनिविषयक सर्व आचारधर्माचे विवेचन प्रवचनसार ग्रंथात आचार्य कुंदकुंदानी केले आहे.

**नियमसार-**

प्रवचनसाराप्रमाणेच आ. कुंदकुंदांचा नियमसार हा ग्रंथ देखील अत्यंत महत्वाचा आहे. ग्रंथारंभीच कुंदकुंदानी वीर जिनांना नमस्कार केला आहे. त्यानंतर ग्रथाचा नावाविषयी देखील स्पष्टीकरण केले आहे. नियमपूर्वक जे केले जाते त्यालाच नियम असे म्हणतात. तो नियम ज्ञान,दर्शन,चारित्ररुप आहे. नियमांच्या विरुध्द गोष्टींचा परिहार करण्यासाठी ‘सार’ शब्दाची योजना केली आहे. या ग्रंथातील जवळ जवळ ८१ गाथा मधून मुनींचे निश्चयात्मक चरित्र सांगितले आहे.ग्रंथाच्या बहुतांशी भागात आवश्यकांचे महत्व व स्वरुप याविषयाचे विवेचन केले आहे. या ग्रंथात प्रतिक्रमण, प्रत्याख्यान, आलोचना, कायोत्सर्ग, सामायिक व परमभक्ति या सहा आवश्यक क्रिया सांगितल्या आहेत. अवशधर्मात्मक जे कार्य केले जाते त्याला आवश्यक असे म्हणतात. आप्त, आगम आणि तत्वविषयक श्रध्दा ठेवून राग व्देषाची निवृत्ति करणे हा मोक्षाचा उपाय असून निर्वाण हे त्याचे फल आहे. पुढे जीवादि सहा द्रव्यांचे वर्णन करुन प्रसंगानुसार विविध व्रते, पाच समिती, तीन गुप्ति यांचे विवेचन करुन अरिहंत, सिध्द, आचार्य, उपाध्याय आणि साधू यांचे स्वरुप प्रकट केले आहे. शेवटी शुध्दात्म्याचे वर्णन करुन आचारविषयक गोष्टींची समाप्ति केली आहे. नियमसारमधील १३४ ते १४० गाथेमध्ये सम्यक्त्व ज्ञान-चरण-भक्ति, निर्वाणभक्ति, सिध्दभक्ति व योगभक्ति यांचा उल्लेख केला आहे. वृषभादि जिनेंद्र योगभक्तिपूर्वकच मुक्त झ ााल्याचे म्हटले आहे. नियमसारवर पद्मप्रभ मलधारिदेव यांची ही ‘तात्पर्यवृत्ति’ ही संस्कृत टीका आहे.

**दशभक्ति-** आ. कुंदकुंदानी एकूण १० भक्ति सांगितल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे- १. तीर्थंकरभक्ति २. सिध्दभक्ति ३. श्रुतभक्ति ४. चारित्रभक्ती ५. अनगारभक्ति ६. आचार्यभक्ति ७. निर्वाणभक्ति ८. पंचपरमेष्ठीभक्ति ९. नंदीश्वरभक्ति १०. शांतिभक्ति. या सर्व भक्ति प्राकृतमध्येच आहेत. त्यांच्या नावाप्रमाणेच त्यात विषयांचे विवेचन केले आहे. या सर्व भक्ती मुनींच्या नित्यपाठामध्ये संमिलित करण्यात आल्या आहेत. यासर्व भक्ती वंदनात्मक व भावनात्मक आहेत. धर्मभावना अधिक बळकट करण्यामध्ये या भक्तिचा उपयोग अधिकाधिक होऊ शकतो.

**अष्टपाहुड-**

आ. कुंदकुंदानी एकूण ८४ पाहुडांची रचना केली असावी. परंतु सध्या ती सर्व उपलब्ध नाहीत. त्यातील आठ पाहुड उपलब्ध आहेत ती पुढीलप्रमाणे- दंसण पाहुड, चरित्रपाहुड, सुत्तपाहुड, बोधपाहुड, भावपाहुड, शीलपाहुड, लिंग पाहुड. या सर्व स्वतंत्र अशा ग्रंथ रचना आहेत.

दंसण पाहुड मध्ये एकूण ३६ गाथा आहेत. या पाहुडामध्ये आत्म्याच्या समस्त गुणामध्ये सम्यग्दर्शनानाच महिमा महान असल्याचे सांगितले आहे.

दंसणमूलो धम्मो उवइट्ठो जिणवरेहीं सिस्साणं । तं सोऊण सकण्णे दंसणहीणो ण वंदिज्जो ।।

जिनेंद्र भगवंतानी शिष्यांच्यासाठी सम्यग्दर्शनाचा हितोपदेश दिला आहे. तो आपल्या कानानी ऐकून सम्यग्दर्शनरहित मनुष्याला वंदन करु नये.

सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट झालेला जीव कधीच मुक्ति प्राप्त करु शकत नाही. सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट असा तो जीव ज्ञान आणि चारित्र्याने देखील भ्रष्टच समजला जातो. असे जीव स्वतः नष्ट होतात व इतरांनाही नष्ट करतात. सहा द्रव्य, नऊ पदार्थ, पंचस्तिकाय, सात तत्व इत्यादि जी जिनप्रणित आहेत. त्यांच्यावर जो श्रध्दा ठेवतो त्यालाच सम्यग्दृष्टी समजावे. जीवादि पदार्थाच्यावर श्रध्दा ठेवणे व्यवहारनयाने सम्यग्दर्शन आहे. व आत्म्यावर पूर्णतः श्रध्दा ठेवणे निश्चय सम्यग्दर्शन आहे. सम्यग्दर्शन सर्व गुणरुपी रत्नात श्रेष्ठ असून मोक्ष महालाची ती प्रथम पायरी आहे. वस्त्रविरहित दोघेही संयमी नाहीत. दर्शन प्राभृतामध्ये प्रामुख्याने सम्यदग्दर्शनाचा महिमा वर्णिला आहे. साधु अथवा मुनीच्या दृष्टिने संयमी राहणे, सम्यग्दर्शनादी गुणांनी युक्त राहणे अतयावश्यक आहे.

**चारित्रपाहुडा** यामध्ये एकूण ४४ गाथा आहेत. या पाहुडा प्रारंभीच मोक्ष आराधनेचे मुख्य कारण सम्यकचारित्र असल्याचे कुंदकुंदानी म्हटले आहे. सम्यग्ज्ञान, सम्यग्दर्शन व सम्यकचरित्र हे आत्म्याचे अविनाशी अनंत भाव आहेत. भगवंतांनी चारित्र्याचे वर्णन दोन प्रकारे केले आहे. १. सम्यक्तवाचरण २. संयमाचरण. निःशंकित, निकांक्षित, निर्विचिकित्सा, अमूढदृष्टि, उपगृहन, स्थितीकरण, वात्सल्य आणि प्रभावना हे सम्यक्त्वाचे आठ गुण आहेत. यांनी शुध्द अशा सम्यग्दर्शनाचे ज्ञानसहित जे आचरण केले जाते त्याला सम्यक्त्वाचरण चारित्र म्हटले आहे. याला दर्शनाचार म्हणले आहे. संयमाचरणानुसार सागार व अनगार असे दोन भेद पडले आहेत. सागारांना दर्शन, व्रत, सामायिक, प्रोषध, सचित्तत्याग, रात्रिभोजनत्याग, ब्रह्मचर्य, आरंभत्याग, परिग्रहत्याग, अनुमतित्याग, उद्दिष्टत्याग या ११ प्रतिमांचे पालन करावयास सांगितले आहे. त्याचबरोबर पाच अणुव्रते, तीन गुणव्रते, चार शिक्षाव्रते यांच्या पालनाबाबत उल्लेख करुन सागारसंयमाचरण संपविले आहे. अनगार अर्थात मुनींच्याविषयी कथन करीत असता मुनींनी पंचेद्रियांना वश करणे पंच महाव्रते धारण करणे, पाच समितीचे पालन करणे व तीन गुप्तीना धारण करण्याविषयी सांगितले आहे. हिंसादि पाच

पापांचा त्याग करणे ही पाच महाव्रते आहेत. महापुरुष ही धारण करु शकतात. कारण ती मूलतःच महान आहेत. अशा प्रकारे संयमाचरणाचे वर्णन करुन कुंदकुंदानी म्हटले आहे की, जो जीव परम श्रध्देने दर्शन,ज्ञान चारित्र्याला जाणतो तोच त्वरित निर्वाणाला जातो. थोडक्यात चारित्र पाहुडामध्ये मुनिधर्म व श्रावकाचार या दोहोंचीही माहिती मिळते.

**सुत्त पाहुडामध्ये-** एकूण २७ गाथा असून सर्वप्रथम सूत्राची व्याख्या करण्यात आली आहे. ज्याचा अर्थरुप उपदेश अरिहंताकडून सांगण्यात येऊन गणधरांनी ज्याची ग्रंथरचना केली तेच सूत्र होय. या सूत्रांच्या साह्याने साधू पुरुष परमार्थाची प्राप्ति करुन घेतात. संसाराचा नाश करतात. सूत्रसहित सुई सुरक्षित राहते व सूत्ररहित हरवते त्याचप्रमाणेच सूत्राचे अनुकरण करणारा मार्गभ्रष्ट न होता, भवसंसार सहजपणे तरुन जातो. जो आगमादि सूत्रांचा अर्थ जाणून त्यांचे यथायोग्य आचरण करतो तोच रागादिक भाव सोडून शुध्द होऊ शकतो. व्यवहार नयाने मोक्षाला पूरक संवर, निर्जरादि तत्वे गुणकारी असून, अजीव,आश्रव व बंधतत्व ही गुणविरहीत आहेत. याच पाहुडामध्ये मुनि आचारविषयी कथन करताना म्हटले आहे की, महान मुनी सिंहाप्रमाणे निर्भय राहून उत्कृष्ठ चारित्र निर्माण करतात. अनेक प्रकारची व्रते, उपवास यांचे पालन करतात. याउलट जे आगमादि सूत्रांचा अर्थ जाणत नाहीत, स्वच्छंद प्रवृत्तीने राहतात ते पापाची प्राप्ती करतात. पुढील काही गाथामधून मुनींचे नग्नत्व व तिल-तुषमात्र परिग्रहाचा त्याग सांगून स्त्रियांच्या प्रवज्येचा निषेध केला आहे. जिनशासनात तीनच लिंगाचे कथन केले आहे- निर्ग्रंथ साधूचे, श्रावकाचे व आर्यिकांचे याशिवाय अन्यलिंग मोक्षमार्गाला योग्य नाही, वस्त्रधारी मनुष्य तीर्थंकर असला तरी तो सिध्दावस्थेला प्राप्त होऊ शकत नाही. वस्त्ररहित निर्ग्रंथमुद्रा धारण करणारे तीर्थंकरच मोक्ष प्राप्त करतात.

**बोधपाहुडात-** एकूण ६२ गाथा असून त्यात आयतन, चैत्यगृह, प्रतिमा, दर्शन, बिंब, जिनमुद्रा, ज्ञान, देव,तीर्थ,अर्हंत व प्रवज्या या अकरा विषयांचे यथार्थपणे विवेचन केले आहे. पंचमहाव्रतांनी युक्त असलेल्या मुनीलाच खरे आयतन, खरे चैत्यगृह, वंदनीय प्रतिमा, सम्यक्त्वज्ञान संयमाने युक्त मोक्षमार्गाचा दर्शत म्हणून खरे दर्शन, तप व व्रतगुणांनी युक्त म्हणून खरी अर्हंत मुद्रा, त्याच्याच ध्यानयोगयुक्त ज्ञानाला खरे ज्ञान, तोच अर्थ-धर्म-काम प्रव्रज्या देणारा खरा देव होय. या मुनीच्या निर्मलधर्मसम्यक्त्व-संयम-तप ज्ञानाला खरे तीर्थ म्हटले आहे. तसेच जरा व्याधी ,जन्म, मरण, चतुर्गति, गमन, पुण्य,पाप इत्यादि सर्व दोषांचा व कर्मांचा नाश करुन ज्याने आपला आत्मा ज्ञानमय केला आहे तोच अर्हंत होय. ज्याच्यामध्ये घर, परिग्रह, मोहाचा अभाव, २२ परिषह, १६ कषाय यांच्यावर विजय व पापकर्मापासून मुक्तता आढळते तीच खरी दिक्षा होय. या दीक्षामध्ये शत्रु-मित्र, निंदा-प्रशंसा, लाभ-अलाभ, तृण-कांचन इत्यादि बाबीसंबंधी समताभाव असतो. निर्धन-सधन यांच्या घरी समतेने आहार घेतला जातो तीच खरी प्रव्रज्या होय. सर्वात शेवटी आ. कुंदकुंदानी स्वतःला

भद्रबाहूचा शिष्य म्हणवून त्यांचा जयजयकार केला आहे. खरोखरच आचारधर्मविषयक गोष्टींचे विवेचन करण्यामध्ये बोध पाहुडाला अधिक महत्व देणे उचित ठरते.

**भावपाहुडामध्ये-** आ.कुंदकुंदानी मंगलाचरणानंतर द्रव्यलिंगी व भावलिंगी श्रमणामधील भेद सांगितला आहे. भावलिंग हे प्रमुख लिंग असून ते परमार्थाला पोषक आहे. द्रव्यलिंगामुळे परमार्थ साधता येत नाही. गुण आणि दोषांचे कारण भाव आहे. भाव शुध्दीसाठी बाह्य परिग्रहाचा त्याग केला जातो. जो अंतर्गत परिग्रहाने युक्त आहे त्याचा बाह्य त्याग निष्फळ आहे. मुनींचा वेष धारण करणे, व्रत, तपांचा अभ्यास करणे, एवढेच नव्हे तर शास्त्रज्ञान प्राप्त करुन घेणे एवढ्यानेच आत्मकल्याण होऊ शकत नाही तर, उलट जेव्हा परिणामांची शुध्दि होईल, रागव्देषादी कषाय नष्ट होतील व आत्मा केवळ आत्मरुपाने रत होईल तेव्हांच आत्मकल्याण संभवते. भावरहित साधू अनेक कोटी जन्मापर्यंत कायोत्सर्गादि करीत वस्त्रांचा त्याग करुन तपाचरण करीत राहिला तरी त्याला सिध्दि मिळत नाही. भावरहित जीवाने नरकादि गतीमध्ये किती तरी दु:ख भोगले आहे. भावरहित जीवांनी अनंत जन्म धारण करुन मातांचे इतके दूध प्राशन केले आहे की, त्यांचे प्रमाण सात समुद्रांच्या पाण्यापेक्षाही अधिक आहे. भावरहित जीवांनी मरण पावून आपल्या मातांना इतके रडविले आहे की, त्यांच्या अश्रूंची तुलना समस्त समुद्रांच्या जलाशी देखील करता येणार नाही. वरील सर्व गोर्ष्टीचे यथायोग्य विवेचन करण्यासाठी बाहुबली,मधुपिंग, बाहुमनि, द्रव्यश्रमण व्दीपायन, श्रमण शिवकुमार यांचे दृष्टांत देऊन मुनिवर्यांना भावशुध्दीसाठी प्रेरित केले आहे. या पाहुडात प्रसंगानुरुप क्रियावादी, अक्रियावादी, अज्ञानी,वैनयिक या पाखंडींचा उल्लेख केला आहे. हे पाहुड साहित्यिक गुणांनी ओतप्रोत भरले आहे. मतिरुपी धनुष्य, श्रुतरुपी दोरी व रत्नत्रयरुपी बाण स्थिर असणा-यांचा परमार्थरुपी वेध कधी चुकत नाही. हे पाहुड एकूण १६४ गाथांनी युक्त आहे.

**लिंगपाहुड-** हे २२ गाथांनी युक्त असून, भावपाहुडाप्रमाणेच लिंगपाहुडाला सर्वज्ञप्रणीत म्हटले आहे. या पाहुडाचे दुसरे नाव श्रमणलिंगपाहुड असे आहे. श्रमणाचा अर्थ मुनि असून मुनींच्या लिंगाविषयी अर्थात वेषाविषयी चर्चा या पाहुडामध्ये करण्यात आली आहे. रत्नत्रयरुपी धर्म हेच खरे लिंग आहे. जे श्रमण लिंग धारण करुन नाचतात, गातात अथवा वाद्य वाजवतात ते श्रमण नसून पापी आहेत. याशिवाय जे संग्रह करुन त्याचे रक्षण करतात, द्यूतामध्ये दंग होतात, विवाह जुळवितात, चोरी लबाडीमध्ये भाग घेतात, भोजनात रसलोलुप राहतात, काम-क्रिडेस प्रवृत्त होतात, प्राणिहत्येची पर्वा करीत नाहीत, स्त्रीवर्गाची करमणूक करतात व इतर क्रियाकर्मामध्ये दुर्लक्ष करतात ते श्रमण अति ज्ञानी असले तरी, खरे श्रमण नव्हेत. ते मृत्यूनंतर स्वर्गात न जाता नरक, तिर्यंचामध्ये आत्यंतिक दु:ख भोगतात. ते पशुपेक्षाही निकृष्ट प्रतीचे असतात. शेवटी सर्वज्ञ देवाकडून उपदेशिलेल्या धर्माचे पालन करणे हेच योग्य आहे असे म्हटले आहे. या लिंगपाहुडात ज्या प्रवृत्तीमुळे श्रमणतत्वाची प्राप्ति न होता

ते बिघडले जाते अशा गोष्टींची माहिती दिली आहे. हे दोष तत्कालीन साधुवर्गात आढळत असावेत म्हणूनच त्यांना असा उपदेश करण्याची पाळी आली असावी.

**शील पाहुडामध्ये-** एकूण ४४ गाथा आहेत. लिंगपाहुडातील विषयांचे विशेष विवेचन करुन पुढे शीलावर अधिक जोर देण्यात आला आहे. शील आणि ज्ञानामध्ये विरोध नसून सहभाग असल्याचे सांगितले आहे. शीलरहित विषय ज्ञानाला नष्ट करतात. जोपर्यत जीव विषयासक्त असतो तोपर्यत तो ज्ञानाला जाणत नाही. आणि उलट ज्ञानाला जाणल्याशिवाय विषयादिपासून मुक्त होऊन पूर्व कर्माचा नाश करु शकत नाही . शीलरहित विशाल ज्ञान निष्फळ आहे, हे सात्यकीपुत्राचा दृष्टांत देऊन सिध्द केले आहे. चरित्ररहित ज्ञान, दर्शनरहित लिंग ग्रहण आणि संयमरहित तप हे सर्व निरर्थक आहेत. ज्ञानरुपी जलानेच जीव शुध्द होतो. शील असेल तरच व्याकरण,छंद,वैशेषिक,व्यवहार व न्यायशास्त्र संबंधीचे ज्ञान सार्थक होईल. शीलाची पूर्ती सम्यग्दर्शनाबरोबरच ज्ञान, ध्यान,योग, विषयविरक्ति व तप यांच्या साधनामुळेच होते. या शीलरुपी जलाने स्नान करणारे शुध्द जीव सिध्द होतात. शीलरहित मनुष्याचा जन्म निरर्थक होय. प्रस्तुत पाहुडामध्ये शीलाचे महत्व विशद करण्याचा यथायोग्य प्रयत्न केलेला दिसतो.

धर्माचरणाचा मुख्य उद्देश मोक्षप्राप्ती हा असून, कुंदकुंदानी मोक्ष पाहुडामध्ये मोक्षाचे विवेचन केले आहे. त्याचे स्वरुप व त्याच्या प्राप्तीची साधने सांगितली आहेत. प्रथमच्या सहा पाहुडावर श्री श्रुतसागर सूरिकृत संस्कृत टीका आहे.

**रयणसार-** आचारधर्माच्या दृष्टीने रयणसार ग्रंथाचे महत्व अन्यन्यसाधारण आहे. यात एकूण १६२ गाथा असून, त्यात श्रावक व मुनींच्या आचाराचे वर्णन केले आहे. यात सम्यक्त्वाला रत्नसार असे म्हटले आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने तथा श्रवणाने मोक्षाची प्राप्ती होत असल्याने सांगितले आहे. सम्यग्दर्शनाविषयीच्या ७० गुणांचा व ४४ दोषांचाही उल्लेख यात केला आहे. गृहस्थासाठी दान आणि पूजा, मुनीसाठी ध्यान व स्वाध्याय आवश्यक सांगितले आहेत. शुभाशुभ भावनांचे वर्णन करुन पुढे गुरु-भक्तीवर अधिक जोर देण्यात आला आहे. भक्तीशिवाय वैराग्य, स्नेहाशिवाय महिलांचे रडणे व वैराग्यरहित त्याग करणे ही तिन्ही विडंबने आहेत. त्यानंतर स्वच्छंदीपणे आचरण करणा-या मुनींची निंदा करुन योग्य आचरण करण्याचा उपदेश दिला आहे. श्लेष्मामध्ये अडकून पडलेली माशी जशी तात्काळ मरते, त्याप्रमाणे परिग्रहाने युक्त असलेला लोभी, अज्ञानी मुनी शेवटी नाशाला कारणीभूत होतो. सर्वात शेवटी गणगच्छाला रत्नत्रयरुप, संघाला नाना गुणरुप संबोधून शुध्दात्म्यालाच संयम म्हटले आहे. रयणसार या ग्रंथाचे अजूनही काळजीपूर्वक असे संपादन होऊ शकले नाही. या गंथ्रात एक दोहा व सहा अपभ्रंश भाषेतील छंद आहेत. ज्याअर्थी या ग्रंथात गणगच्छादिकांचा उल्लेख दिसतो त्याअर्थी हा ग्रंथ कुंदकुंदाचा नसून त्यांच्यानंतरच्या एखाद्या उत्तरकालीन आचार्याने लिहिला असावा असे वाटते.

## मूलाचार-

आचार धर्माचे विवेचन करणारा मूलाचार हा एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाची रचना आचार्य वट्टकेर यांनी केले आहे. मूलाचारविषयीचा हा एक प्रामाणिक ग्रंथ मानला जातो. मूलाचाराला आचारांग असेही म्हटले आहे. वसुदेवनंदीने यावर टीका लिहिली आहे. श्वेतांबरीय मूलाचारनिर्युक्ती, पिण्ड निर्युक्ति, भत्तपरिण्या व मरणसमाही या ग्रंथाशी यातील ब-याचशा गाथा मिळत्या जुळत्या आहेत. या ग्रंथाचा रचनाकाळ निश्चितपणे सांगता येत नाही, तरीसुध्दा भगवती आराधना ग्रंथाइतकाच तो प्राचीन असावा. या ग्रंथात एकूण १२४३ इतक्या गाथा आहेत. या ग्रंथात मूलगूण, बृहत् प्रत्याखान, संक्षेप प्रत्याखान, सामाचार, व पंचासार, पिंडशुध्दी, षडावश्यक, व्दादशानुप्रेक्षा, अनगार भावना, समयसार, शीलगुणप्रस्तार व पर्याप्ति असे १२ अधिकार आहेत. प्रथम गुणाधिकारात ५ महाव्रते, ५ समिती, ५ इंद्रियाचा निरोध, सहा आवश्यकादि, २८ मूलगूणांचे वर्णन आहे. बृहत्प्रत्याख्यान अधिकारात सर्व पापांचा त्याग करुन दर्शनादि चार आराधनेत स्थिर राहून परीषहावर विजय मिळविण्यास सांगितले आहे. तिस-या संक्षेप प्रत्याख्यानाधिकारात आकस्मिकपणे मृत्यू आला तरी सर्व पाप, कषाय व आहार सोडून देऊन मरणाला सामोरे जाण्याचा उपदेश दिला आहे. सामाचाराधिकारात दहा प्रकारच्या आचारांचे वर्णन असून भिक्षागमन व आर्यिका आचरण सांगितले आहे. पंचाचाराधिकारात दर्शनाचार, ज्ञानाचार या पाच आचारांचे विस्ताराने वर्णन करुन कौटिल्य, आसुरक्ष, महाभारत आणि रामायण इत्यादींचा उल्लेख केला आहे. षडवश्यकामध्ये ६ आवश्यकांचे वर्णन आहे. भावनाधिकात लिंग, व्रत, वस्ती, विहार, भिक्षा,ज्ञान, शरीर, संस्कारत्याग, वाक्य, तप, ध्यानासंबंधी दहा शुध्दीचे पालन करणा-या मुनीला मोक्षाची प्राप्ती सांगितली आहे. व्दादशानुप्रेक्षा अधिकारात अनित्य, अशरणादी १२ अनुप्रेक्षाचे वर्णन आहे. समयसाराधिकारात शास्त्राच्या साराचे विवेचन आहे. प्रर्याप्ति अधिकारात संज्ञा, लक्षण, स्वामित्वादि सहा पर्याप्तींचे सहा पर्याप्तींचे वर्णन केले आहे. शीलगुणाधिकारात १८ हजार शील भेदांचे विवेचन केले आहे. वट्टकेर स्वामीकृत मूलाचार हा ग्रंथ मूलाचाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मानला असून त्यातून ऐतिहासिक गोष्टी तथा प्राचीन ग्रंथाचीही माहिती मिळते.

**भगवती आराधना-** भगवती आराधना हा दिगंबर संप्रदायातील एक प्राचीन ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचे लेखक शिवार्य आहेत. यात सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चरित्र आणि सम्सक्तपया चार आराधनांचे विवेचन केले आहे. प्रामुख्याने मुनिधर्माचे विवेचन करणे हाच या ग्रंथाचा प्रमुख उद्देश आहे. श्वेतांबरीय कल्प, व्यवहार, आचारांग, जीतकल्प या ग्रंथाचा उल्लेख मिळतो. यात एकूण २१६६ गाथा असून हा ग्रंथ ४० अधिकारात विभक्त आहे. या ग्रंथाची भाषा प्राकृत अथवा जैन

शौरसेनी आहे. आगमग्रंथाइतकाच हा ग्रंथ प्राचीन वाटतो. या ग्रंथावर अनेक प्राकृत आणि संस्कृत टीका लिहिल्या गेल्या आहेत.

प्रस्तुत ग्रंथात प्रारंभी १७ प्रकारची मरणे सांगितली आहेत. लिंग अधिकारात आचेलक्य, लोच, देहममत्वाचा त्याग, मयूरपिंछी धारण करणे ही निर्ग्रंथाची लिंगे सांगितली आहेत. केशलोच यात श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. पुढे सल्लेखनाचे वर्णन केले आहे.

**रत्नकरण्ड-श्रावकाचार**

श्रावकाचाराविषयीचे संस्कृत ग्रंथ-

श्रावक आचाराचे व्यवस्थितरीत्या वर्णन करणारा हा एक अत्यंत महत्वपूर्ण असा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा कर्ता कोण असावा याविषयी मात्र बराच मतभेद आहे. टीकाकार प्रभाचंद्राने हा ग्रंथ समंतभद्रांनी लिहिल्याचे म्हटले आहे. उलट वादिराजकृत पार्श्वनाथ चरित्राच्या उत्थानिकेत याचा कर्ता समंतभद्रापेक्षा वेगळा असून तो योगिंद्र असल्याचा उल्लेख आहे. काहींच्या मते यांच्यापेक्षाही दिली जाते. हा ग्रंथ पाच परिच्छेदात विभक्त असून, त्यात एकूण १५० इतकी श्लोकसंख्या आहे. प्रथम परिच्छेदात धर्माचे स्वरुप कथन करुन सम्यग्दर्शनाचे महत्व प्रगट केले आहे. दुस-या परिच्छेदात सम्यग्ज्ञानाचे वर्णन असून तिस-यात पाच गुणव्रते यांचे वर्णन आहे. चौथ्या परिच्छेदात चार शिक्षाव्रतांचे वर्णन असून पाचव्या परिच्छेदात संल्लेखनेसह ११ प्रतिमांचे विस्तृत विवेचन केले आहे. कुंदकुंदाच्या चारित्र पाहुडाप्रमाणेच सल्लेखनेचा श्रावकाच्या व्रतामध्ये समावेश करण्यात आला आहे. या ग्रंथावर प्रभाचंद्रविरचित एक संक्षिप्त संस्कृत टीका आहे. या टीका आहे. या टीकेबरोबरच मूल ग्रंथाचे प्रकाशन दि. जैन ग्रंथमाला मुंबई व्दारा झाले आहे.

**यशस्तिलकचंपू-**

प्रस्तुत ग्रंथ आ. सोमदेव यांनी लिहिला असून, त्यांचा काळ इ. ९४३ ते ९६८ इतका मानला जातो. या ग्रंथात यशोधरचरित्र कथन केले असून, संस्कृत भाषेतील हा एक चंपूग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचे विभाजन आश्वासामध्ये केले असून ५ ते ८ आश्वासामध्ये चारित्राचे वर्णन आहे. विशेषतः ७ ते ८ आश्वासामध्ये श्रावकांच्या १२ व्रतांचे सविस्तर वर्णन केले आहे. भाषाशैली प्रौढ असून या ग्रंथाची समाप्ति ९५६ मध्येच झाली असावी. हा ग्रंथ काव्य अलंकारादि दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. या ग्रंथात काही ठिकाणी शिथिलाचार पोषक गोष्टींचे कथन करण्यात आले आहे. यावरुन हा ग्रंथ आचार्य सोमदेवांचा नसावा असे मानण्यात येते.

श्रावकाचार-

श्रावकाचार ग्रंथाची रचना अमितगति यांनी केली असून या ग्रंथाचा रचनाकाल सुमारे इ.स. १००० इतका मानला जातो. हा ग्रंथ जवळ जवळ १५०० संस्कृत श्लोकांनी परिपूर्ण असून, या ग्रंथाचे

विभाजन एकूण १५ अध्यायामध्ये करण्यात आले आहे. या ग्रंथात प्रथम, धर्माचे स्वरुप, मिथ्यात्व व सम्यक्त्व यातील विशेष फरक,सात तत्वे, अष्टमूलगुण, १२ व्रते, त्यांचे अतिचार, सामायिकादि सहा आवश्यके, दान, पूजा व उपवास यांचे वर्णन करुन नंतर १२ भावनांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. या ग्रंथातील शेवटच्या अध्यायातील १४४ श्लोकामधून ध्यानाचे वर्णन करण्यात आले आहे. त्यात ध्यान, ध्याता आणि ध्येय व ध्यानफल यांचे विवेचन आहे. स्वतः लेखकाने आपल्या अनेक ग्रंथामधून ग्रंथाच्या रचनाकालाविषयी माहिती दिली आहे.

**सागरधर्मामृत-**

या ग्रंथाची रचना पं आशाधर यांनी केली असून श्रावकाचारविषयीचा हा एक ग्रंथ आहे. या ग्रंथकर्त्याचा काळ सुमारे इ.स. ११७३ ते १२४३ इतका मानण्यात येतो. या ग्रंथाची रचना संस्कृत श्लोकबध्द असून, श्रावकाचाराचे यात विस्तृत वर्णन करण्यात आले आहे. यात एकूण आठ अध्याय आणि ४७७ इतके श्लोक आहेत. या आठ अध्यायाव्दारे श्रावकधर्माचे सामान्य वर्णन, अष्टमूलगूण व ११ प्रतिमांचे वर्णन केले आहे. शेवटच्या आठव्या अध्यायातील ११० श्लोकाव्दारे समाधिमरणाचे स्वरुप विस्तृतपणे कथन केले आहे. या ग्रंथाची रचना काव्यमय असून यावर स्वोपज्ञ टीका आहे.

**श्रावकाचार-**

या ग्रंथाची रचना गुणभूषण यांनी केले आहे. स्वतः लेखकाने या ग्रंथाला भव्यजनचित्तवल्लभ म्हणून संबोधिले आहे. या ग्रंथाची रचना अंदाजे १४ ते १५ व्या शतकात झाली असावी. या ग्रंथात एकूण २६९ श्लोक असून त्यात दर्शन,ज्ञान व श्रावकधर्म असे प्रामुख्याने तीन उद्देश आहेत. या ग्रंथावर रत्नकरण्ड व वसुनंदी श्रावकाचार यांचा प्रभाव पडलेला आढळतो.

**उपसकाध्ययन-**

प्रस्तुत ग्रंथाची रचना आचार्य वसुनंदि यांनी केली आहे. या ग्रंथाला वसुनंदिश्रावकाचार असेहि म्हटले आहे. या ग्रंथाची रचना साधारणपणे १२व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली असावी. पंडित आशाधर यांनी सागरधर्मामृतच्या टीकेत वसुनंदीचा उल्लेख मोठ्या आदराने करुन काही गाथा देखील उधृत केल्या आहेत. यात एकूण ५४६ इतक्या गाथा असून यात श्रावकाचाराचे विस्तृत विवेचन करण्यात आले आहे. ग्रंथाच्या प्रशस्तीमध्ये लेखकाने कुंदकुंद आम्नायामध्ये श्रीनंदि, नयनंदि, नेमिचंद्र व वसुनंदि अशी आचार्य परंपरा दिली आहे. ग्रंथारंभी सम्यग्दर्शनाचे स्वरुप स्पष्ट करुन जीवांचे भेदोपभेद सांगितले आहेत. द्यूत, मद्य, मांस, वेश्या, शिकार, चोरी , परस्त्रीसेवन इत्यादि सात व्यसनांचे वर्णन करुन व्रतप्रतिमेत १२ व्रतांचा उल्लेख केला आहे. दान फलाचे विस्तृत विवेचन केले आहे. पूजेचे स्वरुप सांगितले असून त्यापासून मिळणा-या फळाविषयी कथन केले आहे. वसुनंदीची विशेषता अशी

की, रात्रिभोजन त्याग पहिल्या प्रतिमेमध्येच आवश्यक आहे असे सांगून ६व्या प्रतिमेमध्ये त्याऐवजी दिवा ब्रम्हचर्य सांगितले आहे. या ग्रंथातील अनेक गाथा देवसेनाच्या भावसंग्रह ग्रंथाच्या आधारे लिहिल्यासारख्या वाटतात.

**धर्मरत्नप्रकरण-**

या ग्रंथाचे कर्ते शांतिसूरि असून त्यांनीच या ग्रंथावर स्वोपज्ञ वृत्तीची रचना केली आहे. शातीसूरि साधारणपणे १२व्या शतकातील एक विव्दान मानले जातात. या ग्रंथात एकूण १८१ गाथा असून, त्यात श्रावकाला सौम्यता, पापभिरुता, लाजरेपणा, सुदीर्घदर्शीपणा इत्यादि २१ आवश्यक गुणांनी युक्त व्हावयास सांगून भावश्रमणाची लक्षणे व शीलाचे वर्णन केले आहे. प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन जैनग्रंथ प्रकाशक सभा अहमदाबाद (वि.सं.१९५३) येथून झाले आहे.

**मुनि आचारविषयक संस्कृत ग्रंथ-**

प्राकृत ग्रंथाप्रमाणेच मुनि आचारविषयीची माहिती आपणाला काही संस्कृत साहित्यातून देखील पहावयास मिळते. आ. कुंदकुंदाच्यानंतर उमास्वामी हे प्रमुख व महान आचार्य होऊन गेले. या आचार्यांनीच प्राकृत साहित्यामध्ये जैनधर्मविषयक संस्कृत साहित्य लिहिण्यास सुरुवात केली. त्यांचेच अनुकरण नंतर पूज्यपादादि काही आचार्यानी केलेले दिसते. मुनि आचाराची माहिती देणारा आचार्य उमास्वातींचा प्रशमरति प्रकरण हा महत्वाचा ग्रंथ असून, त्याशिवाय अमृतचंद्रसूरिकृत पुरुषार्थसिध्द्युपाय , चामुंडराकृत चरित्रसार, वीरनंदिकृत आचारसार हे ग्रंथ महत्वाचे आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहेत.

**१.प्रशमरति प्रकरण-**

प्रस्तुत ग्रंथ महान आचार्य उमास्वाति यांनी लिहिला असून, तो ३१३ संस्कृत पद्यांनी बध्द आहे. या ग्रंथामध्ये जैन दर्शनाविषयक अनेक गोष्टींचे विवेचन केले आहे. जैन तत्वज्ञान, कर्मसिध्दांत, साधु व श्रावक यांचा आचार, १२ भावना, उत्तम क्षमादिक दशधर्म, धर्मध्यान, केवलज्ञान यांचे वर्णन करुन अयोगी व सिध्द यांचे स्वरुप कथन केले आहे. महान टीकाकार हरिभद्रसूरीने विषयानुसार या ग्रंथाचे एकूण २२ विभाग केले आहेत. या ग्रंथावरील सटीक हिंदी अनुवादाचे प्रकाशन मुंबई येथून १९५० मध्ये झाले आहे.

**२.पुरुषार्थसिध्द्युपाय-**

अमृतचंद्रसूरींनी लिहिलेला पुरुषार्थसिध्द्युपाय हा एक आचारविषयक अति महत्वाचा असा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचा रचनाकाल साधारणपणे विक्रम संवत १०५५ इतका मानला जातो. पुरुषार्थसिध्द्युपाय या ग्रंथाला उपासक श्रावकांची आचारसंहिता असे म्हटले असून काही ठिकाणी

जिन-प्रवचन रहस्य या नावानेही संबोधिले आहे. सद्विवेकाव्दारे अमृतस्वरुप आचारसाराचा रसास्वाद घेणे हाच अंतरात्म्याचा श्रेष्ठ पुरुषार्थ असल्याचे सांगितला आहे.

या ग्रंथातील २२६ संस्कृत श्लोक असून त्यातूनच रत्नत्रयाचे विवेचन करण्यात आले आहे. या श्लोकातून क्रमाने चारित्रविषयक अहिंसादि पाच व्रते, सात शील, सल्लेखना आणि सम्यक्त्व त्याचप्रमाणे सम्यक्त्व सल्लेखनेसह १४ व्रत-शीलादिकांचे ७० अतिचार व त्यांचे स्वरुप सांगितले आहे. तसेच १२ तप, ६ आवश्यके, तीन दंड, पाच समिती,दहा धर्म, १२ भावना व २२ परिषह इत्यादि बार्बीचे विवेचन केले आहे. हिंसा व अहिंसा यांच्या स्वरुपाचे आणखी सूक्ष्म वर्णन करुन घेणे म्हणजेच अर्थसिध्दि होय असे कथन केले आहे. प्रामुख्याने पुरुषार्थ सिध्दीचा उपाय कोणता या मूल गोष्टींचे विवेचन करण्याचा प्रयत्न या ग्रंथातून केला आहे. ह्या ग्रंथाची शैली सुरुवातीपासून शेवटपर्यंत विशद व विवेचनात्मक आहे. ही शैली सरळ, सुंदर व प्रासाद गुणांनी युक्त आहे.

**चरित्र-सार-**

मुनि आचारविषयी माहिती देणारा हा एक संस्कृत ग्रंथ असून, या ग्रंथाला भावनासारसंग्रह असेही म्हटले आहे. या ग्रंथामध्ये जैन धर्माचे कर्मसिध्दांत, साधू व श्रावकांचा आचार, बारा भावना, उत्तम क्षमादिक दशधर्म, धर्मध्यान, केवलज्ञान, अयोगी व सिध्द स्वरुप या विविध विषयांचे स्पष्टीकरण केले आहे. या ग्रंथाच्या पुष्पिकेमध्ये अजितसेन भट्टरकाच्या चरणप्रसादाने चार अनुयोगरुपी समुद्रपारगामी धर्मविजय चामुंडरायाने हा ग्रंथ लिहिला असावा असा उल्लेख आहे. या ग्रंथात रणरंगसिंह याने तत्वार्थ सिध्दांत, महापुराण व आचारशास्त्र यात विस्तारपूर्वक निरुपण केलेल्या चारित्र्याचा सार येथे संक्षेपाने दिला आहे. या उल्लेखावरुन हा ग्रंथ श्रवणबेळगोळ येथे गोमटेश्वर मूर्तीची स्थापना करणारा व ज्याच्यासाठी नेमिचंद्रानी गोम्मटसार लिहिले तो चामुंडराय असावा. यावरुन या ग्रंथाची रचना ११व्या शतकात झाली असावी.

**आचारसार-**

हा ग्रंथ वीरनंदी यांनी लिहिला असून, तो वट्टेकरच्या प्राकृत मूलाचाराच्या आधारे लिहिण्यात आला आहे. यात जवळजवळ १००० इतके संस्कृत श्लोक आहेत. वीरनंदीने आपल्या गुरुचे नाव मेघचंद्र असे सांगितले आहे. श्रवणबेळगोळ येथील ५०व्या शिलालेखामध्ये यांचा उल्लेख मिळतो. शिलालेखातून वीरनंदीला सिध्दांतवेदी, लोकप्रसिध्द, योगि-जनाग्रणी व अमलचरित या पदव्यांनी विभूषित केले आहे. या ग्रंथात अनुक्रमे मुनींच्या उत्त्र गुणांचे वर्णन केले असून, त्यात मूलगूण, सामाचार, दर्शनाचार, ज्ञानाचार, चारित्राचार, तपाचार, वीर्याचार, शुध्द्यष्ट, षडावश्यक, ध्यान, जीवकर्म व दशधर्मशील असे बारा अधिकार आहेत.

**सिंदूरप्रकार व शृंगार-वैराग्य-तरंगिणी-**

हे दोन ग्रंथ नीतीउपदेशात्मक आहेत. दुसरा ग्रंथ प्रोढात्मक आहे. त्यात कामवासनेपासून कसे अलिप्त रहावे याची माहिती दिली आहे.

**षट्खंडागम-**

दिगंबर मान्यतेनुसार मूल आगमग्रंथ कालप्रवाहात हळू हळू नष्ट होत गेले. त्यातील काही ज्ञान मुनिप्रणालीमध्ये काही अंशाने राहिले. कारण श्रुतकेवली भद्रबाहु स्वामीनंतर श्रुतकेवली कोणीच झाले नाही. त्यामुळे १४ पूर्वापैकी ४ पूर्वाचे ज्ञान त्यांच्याबरोबर लुप्त झाले. त्यानंतर ११ आचार्य ११ अंगाचे व १० पूर्वाचे ज्ञाते झाले. पुढे ५ आचार्य फक्त ११ अंगाचे ज्ञाते झाले व नंतर पूर्वाचे ज्ञान जवळ जवळ नष्ट झाले. चार आचार्य तेवढेच आचारांगाने ज्ञाते झाले. याप्रमाणे अंगज्ञानही हळू हळू नष्ट पावू लागले. वीरनिर्वाणानंतर अशी जवळ जवळ ६८३ वर्षे निघून गेली. अंग व पूर्वाचे शिल्लक राहिलेले ज्ञानही नष्ट पावण्याची वेळ आली, तेव्हा धरसेन आचार्यानी महिला नगरीतील यतिसंघाला पत्र पाठवून अत्यंत विनयशील, शीलवान व सर्व कलेत पारंगत असणा-या आ. पुष्पदंत व भूतबली यांना गिरनार येथे बोलावून घेतले. धरसेनांनी त्या दोघांची परीक्षा घेतली व पुढे त्यांना आपले शिष्य बनवून त्यांच्याकडून श्रुताभ्यास करविला. हा श्रुताभ्यास आषाढ शुक्ल एकादशीला समाप्त झाला. आ. पुष्पदंत भूतबलि रचित जी सूत्ररुप रचना करण्यात आली त्यालाच षट्खंडागम असे म्हणतात. याला खंडसिध्दांत अथवा षट्खंडसिध्दांत या नावाने देखील संबोधिले जाते. याचा रचनाकाल वि.सं. प्रथम शतक मानला जातो.

षट्खंडागम द्रव्यानुयोगातील एक अत्यंत महत्वाचा ग्रंथ समजला जाते. त्याला कर्मग्रंथ असेही म्हणतात. हा ग्रंथ एकूण सहा विभागात विभागला आहे- १. जीवस्थान २. खुद्दाबंध ३. बंधस्वामित्वविचय ४. वेदन ५. वर्गणा ६. महाबंध. जीवस्थान खंडातर्गत सत्प्ररुपणेची रचना आ. पुष्पदंत यांनी १७७ सूत्रात केली असून बाकी ग्रंथाची रचना आचार्य भूतबली यांनी एकूण ६००० सूत्रात केली आहे. जन्म-मरणाच्या फेऱ्यात भ्रमण करीत असणारा संसारी प्राणी, कधी देव होतो तर कधी नारकी, कधी मनुष्य होतो तर कधी तिर्यंच, कधी ज्ञानी तर कधी अज्ञानी, कधी सुखी तर कधी दु:खी, कधी स्वरुपवान तर कधी कुरुप.या संसारी प्राण्याला सुख अल्प मिळते् तर दु:ख फार असते. याविषयी विचार करता असे दिसून येते की, प्राण्याला त्याच्या कर्मानुसार बरे वाईट फळ भोगवे लागते. शुभ अथवा अशुभ कर्मानुसार त्याला बंध होत असतो. ज्याप्रमाणे आंबा पिकल्यावर खाणा-याला तो गोड अथवा आंबट लागतो, त्याप्रमाणे कर्म देखील जीवाला शुभ अशुभ फळ देत असते. जीव स्वत: कर्माचा कर्ता व भोक्ता असतो. जीवाला तपाचरणाने कर्मबंध रोखता येतो, आत्मअभिलाषी भव्य जीव शरीर आणि आत्मा यांचा अनुभव घेऊन दुसऱ्यांदा विषयी राग अथवा व्देष

धारण करीत नाही व उत्तम पदाची प्राप्ती कसा करुन घेतो इत्यादिविषयी माहिती षटखंडागम या ग्रंथात दिली आहे.

**षट्खंडागम ग्रंथातील सहा खंडाची माहिती खालीलप्रमाणे आहे-**

१. जीवठ्ठाण- षट्खंडातील हा प्रथम खंड आहे. यात १.सत्  २.संख्या,  ३. क्षेत्र, ४. स्पर्शन. ५. काल, ६. अंतर, ७.भाव व ८. अल्पबहुत्व हे आठ अनुयोगव्दार असून १. प्रकृती २. समुत्कीर्तना, ३-५. तीन महादण्डक, ६. जघन्य स्थिती, ७. उत्कृष्ठ स्थिती, ८. सम्यक्त्वोत्पत्ति आणि ९. गति-अगति. या नऊ चूलिका आहेत. श्रवलाकराने या खंडाचा विस्तार १८ हजार पद इतका सांगितला आहे. आठ अनुयोगाव्दार व नऊ चूलिकाव्दारे गुणस्थान व मार्गणाविषयी विस्तृत विवेचन केले आहे. जीवस्थान अंतर्गत सत्प्ररुपणामध्ये १७७ सूत्र आहेत. प्रथम सूत्रात पंचपरमेष्ठींना नमस्कार करुन मार्गणांचे प्रयोजन सांगितले आहे. त्यानंतर आठ अनुयोगव्दारा प्रथम सत्प्ररुपणेच्या विवेचनाला प्रारंभ होतो व नंतर मार्गणांचे विवेचन येते. टीकाकार वीरसेनाने दक्षिण पथवासी आचार्याना पत्र पाठवून मूनींना बोलावून घेतल्याविषयीचे वर्णन येथे केले आहे.

मोह व योग यांचा उदय, उपशम, क्षयोशपम आणि क्षय यांच्या साह्याने जीवाला जी स्थिती प्राप्त होते त्याला गुणस्थान असे म्हणतात. गुणस्थानाचे एकूण १४ प्रकार सांगितले आहेत. तसेच ज्या अवस्था विशेषतांच्या व्दारे जीवांच्या शोध घेतला जातो त्याला मार्गणा म्हणतात. त्या चौदा आहेत - गति, इंद्रिय, काय, योग, वेद,कषाय, ज्ञान, संयम, दर्शन, लेष्या, भव्यत्व, सम्यकत्व, संज्ञी, आहार. प्रथमतः जीवस्थानामध्ये जीवस्थानामध्ये कोणता जीव कोणत्या गुणस्थानामध्ये आहे, अथवा कोणत्या जीवांची किती गुणस्थाने संभवतात, गुणस्थानवर्ती जीवांची संख्या किती आहे, ते कोठे राहतात, कुठपर्यंत भ्रमण करतात कोणत्या गुणस्थानाचा किती काळ  आहे, एका गुणस्थानाला सोडून पुनः त्या गुणस्थानाची प्राप्ती करुन घेण्यासाठी किती काळ लागतो, कोणत्या गुणस्थानामध्ये औदयिक इत्यादि किती भाव होऊ शकतात, तसेच विवक्षित गुणस्थानवर्ती जीव कोणत्या गुणस्थानवर्ती जीवाहून भारी अथवा हलका असतो, या सर्व गोष्टींचा  विचार प्रथम गुणस्थानाच्या आधाराने केला आहे. त्यानंतर या सर्व बाबींचा विचार पुनः गति व इंद्रिय इत्यादि १४ मार्गणांच्याव्दारे देखील केला आहे. शेवटी अनेक प्रकारच्या कर्मप्रकृतींचा  निर्देश करुन त्यांच्या निरनिराळ्या स्थिती आणि उदयामध्ये येणा-या योग्य कालाची चर्चा करुन, कोणत्या पर्यायात किती कोणते गुण प्राप्त होतात, अथवा  आयुष्य संपताच पूर्व शरीराला सोडून कोणता जीव कोठे उत्पन्न होतो याचे विवेचन केले आहे. याच प्रसंगी कोणता जीव कोणत्या प्रकारे सम्यग्दर्शन आणि चारित्राला प्राप्त करु शकतो याचीही चर्चा येथे केली आहे. हा खंड शिताबराय लक्ष्मीचंद जैन, साहित्योध्दारक फंड अमरावतीहून प्रारंभीच्या ६ विभागाव्दारे प्रकाशित झाला आहे.

२. **क्षुद्रकबंध-** हा षट्खंडातील दुसरा खंड असून त्यामध्ये बंधकजीवांची चर्चा केली आहे. यामुळेच याला क्षुद्रकबंध असे म्हटले आहे. या खंडात ११ मुख्य तथा प्रास्ताविक व चूलिका या प्रकारे सर्व मिळून १३ अधिकार असून एकूण १५८६ इतकी सूत्रे आहेत. पूर्व जीवस्थान खंडामध्ये जीवांचे जे विवेचन गुणस्थान आणि मार्गणाव्दारे केले आहे ते काही विशेषतांच्यासह गुणस्थान निरपेक्ष केवल मार्गणांच्याव्दारे ११ अनुयोगामध्ये केले आहे. ते ११ अनुयोग पुढीलप्रमाणे आहे- १. एक जीवाच्या अपेक्षेने स्वामित्व २. एक जीवाच्या अपेक्षेने काल ३. एक जीवाच्या अपेक्षेने अंतर ४. नाना जीवांच्या अपेक्षेने भंगविचय ५.द्रव्यप्रमाणानुगम ६. क्षेत्रानुगम, ७. स्पर्शानानुगम ८. नानाविध जीवांच्या अपेक्षेने काल ९. नाना जीवांच्या अपेक्षेने अंतर १०. भागाभणानुगम, ११. अल्पबहुत्वानुगम. या अनुयोगापूर्वी प्रास्ताविक रुपात बंधांच्या सत्वस्वरुपाचे विवेचन करुन शेवटी रुपामध्ये महादंडक दिला आहे. दृष्टिवादातील चतुर्थ भेद पूर्वांतर्गत अग्रायणी पूर्व पंचम वस्तु चयनलब्धीच्या सहाव्या पाहुडबंधाच्या बंधक नावाच्या अधिकारापासून या खंडाचा उध्दार करण्यात आला आहे.

**३.बंधस्वामित्वविचय-** याचा अर्थ बंधाच्या स्वामित्वाचा विचार होय. कोणता कर्मबंध कोणत्या गुणस्थानात अथवा मार्गणामध्ये संभवतो याचे येथे विवेचन केले आहे. या खंडात ३२४ सूत्रे आहेत. पहिल्या ४२ सूत्रामध्ये केवळ गुणस्थानानुसार विवेचन केले आहे. बाकीच्या सूत्रात मार्गणानुसार गुणस्थानांचे विवेचन केले आहे. त्यासाठी प्रश्नोत्तररुप शैलीचा वापर देखील केलेला दिसतो.

**४. वेदनाखंड-** या खंडाला प्रारंभ करताना प्रथमत ''णमो जिणाणं, णमो ओहिजिणाणं '' इत्यादि ४४ सूत्रांच्याव्दारें मंगलाचरण म्हटले आहे. यात कृति आणि वेदना अनुयोगव्दारांचे स्पष्टीकरण केले आहे. वेदना अधिकार अधिक प्रतिपादला असल्यामुळे या संपुर्ण खंडाला वेदनाखंड असे नाव देण्यात आले आहे. ४४ सूत्रांच्याव्दारे जे मंगलाचरण धरसेनाचार्यांच्या जोणिपाहुडमधील गणधरवलयमंत्र रुपामध्ये मिळते. या सूत्रामध्ये जिन, अविधिजिन, परमावधिजिन. विपुलमतिजिन, दशपूर्वीजिन, चारण, विद्याधर, आकाशगामी,दीप्ततप, उग्रतप, महातप, घोरतप, मनोबली, वचनबली, कायबली, सर्वसिध्दायतन आणि वर्धमान बुध्द ऋषी यांना नमस्कार केला आहे. पुढील १६ अधिकाराव्दारे वेदनेचे वर्णन करण्यात आले आहे- १. निक्षेप २.नय ३. नाम, ४. द्रव्य, ५. क्षेत्र, ६. काल, ७. भाव, ८. प्रत्यय, ९. स्वामित्व, १०. वेदना, ११. गति, १२. अनन्तर, १३. सन्निकर्ष, १४. परिणाम, १५. भागानुभाग , १६. अल्पबहुत्वानुगम या खंडाचा विस्तार १६ हजार पद इतका सांगितला आहे.

**५. वर्गणाखंड-** पाचव्या खंडाचे नाव वर्गणाखंड असून त्यात स्पर्श, कर्म व प्रकृति नामक तीन अनुयोगाव्दारांचे,स्पष्टीकरण केले आहे. स्पर्श अनुयोगव्दारात स्पर्शनिक्षेप, स्पर्शनयविभाषता,

स्पर्शनामविधान, स्पर्शद्रव्यविधान या १६ अधिकाराव्दारे स्पर्शविषयक विचार केला आहे. कर्म अनुयोगाव्दारे नामकर्म, स्थापनाकर्म, द्रव्यकर्म, प्रयोगकर्म, समवदानकर्म अधःकर्म, ईर्यापथकर्म, तपःकर्म, क्रियाकर्म आणि भावकर्म याचे विवेचन आहे. प्रकृतिअनुयोगव्दारामध्ये प्रकृतिनिक्षेप इत्यादि १६ अनुयोगाव्दारात भाषाविषयक उल्लेख करीत असताना करि, पारसीक, सिंघल, बर्बरीक इत्यादि देशवासींच्या भाषेला कुभाषा म्हटले आहे. शिवाय तीन कुरु, तीन लाड, तीन महाराष्ट्र, तीन मालव, तीन गौड, तीन तीन मगध देशांच्या भाषांचे भेदानुरुप १८ प्रकार सांगितले आहेत. श्रुतज्ञानाचे स्वरुप कथन करित असताना, व्दादशा्ंग वाणीच्या मुख्यतेने त्याचे संख्यात भेद केले आहेत. पुनः अवधि, मनःपर्याय व केवलज्ञानाचे स्वरुप सांगितले आहे.

कर्मसंबंधित बंध, बंधक, बंधनीय आणि बंधविधान या चार अवस्था सांगितल्या आहेत आहेत. द्रव्याचे द्रव्याबरोबर अथवा द्रव्य भावाचा जो संयोग वा समवाय होतो त्यालाच बंध असे म्हणतात. हा बंध ज्या जीवाच्याकडून केला जातो त्याला बंधक असे म्हणतात. बंधाला योग्य जे पुद्‌गल द्रव्य आहे त्याला बंधनीय असे म्हणतात व बंधभेदांना बंधविधान असे म्हणतात. ते प्रकृति, स्थिती, अनुभाग आणि प्रदेश या चार प्रकारचे आहे. या ठिकाणी  बंध, बंधक आणि बंधनीय या तिन्हींची चर्चा केली आहे. याशिवाय बंधविधानाचे विस्तृत विवेचन महाबंध नावाच्या सहाव्या खंडात केले आहे.

१. **महाबंध-** षट्‌खंडागमातील हा शेवटचा खंड आहे. याला महाधवल नावाने देखील संबोधिले जाते. याची चना आचार्य भूतबलीने केली आहे. याचे मंगलाचरण वेगळे नसून षट्‌खंडागमातील चौथ्या खंडातीलमंगलाचरणाशी याचा संबंध आहे.तरी देखील ही महान कृति एक स्वतंत्र कृति समजण्यासारखी आहे. कारण ही कृति पहिल्या पाच खंडापेक्षा विशाल आहे. दुसरे असे की, या खंडावर टीका लिहिण्याची गरज नसल्याचे सांगितले आहे. या खंडाचा विस्तार ४० हजार श्लोक इतका आहे.महाबंधाचे विभाजन सात भागात केले आहे. प्रथम विभागामध्ये प्रकृतिबंध नामक प्रथम अधिकाराचे वर्णन सर्वबंध, नोसर्वबंध उत्कृष्टबंध, अनुत्कृष्टबंध यात केले आहे. दुस-या विभागात स्थितीबंध अधिकाराचे वर्णन केले आहे. याचे मूलप्रकृतिस्थितिबंध व उत्त्तरप्रकृतिस्थितिबंध असे दोन प्रमुख अधिकार आहेत. मूलप्रकृतिस्थितिबंधाचे पुनः चार अधिकार आहेत- स्थितिबंधस्थानप्ररुपणा, निषेकप्ररुपणा,आबाधकांडप्ररुपणा आणि अल्पबहुत्व. पुढे अध्दाच्छेद, सर्वबंध, नोसर्वबंध, उत्कृष्टबंध इत्यादि धिकाराव्दारे मूलप्रकृतिस्थितिबंधाचा विचार केला आहे. उत्तरप्रकृतिस्थितिबंधाचा विचार देखील अशाच प्रकारे केला आहे. तिस-या विभागात स्थितिबंधाच्या शेष भागाचे वर्णन चालू आहे. बंधसन्निकर्ष, नाना जीवांच्या अपेक्षेने भंगविचय, भागाभागप्ररुपणा, परिणामप्ररुपणा, क्षेत्रप्ररुपणा, कालप्ररुपणा, अंतरप्ररुपणा,भावप्ररुपणा आणि अल्पबहुत्व नामक अधिकाराव्दारे विषयाचे विवेचन केले आहे. चौथ्या भागात अनुभागबंध अधिकाराचे विवेचन केले आहे. मूलप्रकृतिअनुभागबंध आणि उत्तरप्रकृतिअनुभागबंध अपेक्षेने तो २

प्रकारचा आहे. याचे निषेकप्ररुपणा, स्पर्धकप्ररुपणा इत्यादि अधिकाराव्दारे स्पष्टीकरण केले आहे.

पाचव्या भागामध्ये अनुभागबंध अधिकाराच्या शेष भागाची माहिती दिली आहे. सन्निकर्ष, भंगविचय, भागाभाग, परिणाम, क्षेत्र, स्पर्शन व्दारा याचे विवेचन केले आहे. सहाव्या भागात प्रदेशबंध अधिकाराचे वर्णन आहे. यात प्रत्येक समयात बंध प्राप्त करणारे मूल व उत्तर कर्मप्रदेशाच्या आश्रयाने

**कसायपाहुड(कषायप्राभृत)**

षट्खंडागमाप्रमाणेच कषायगमाप्रमाणेच कषायप्राभृत व्दादशांगाचेच एक महत्वपूर्ण अंग मानले जाते. या ग्रंथाचा उध्दार मूलप्रकृतिप्रदेशबंध व उत्तरप्रकृतिप्रदेशबंध याचा विचार केला आहे, अनेक अनुयोगाव्दारे याचे स्पष्टीकरण

केले आहे. महाबंधाच्या सातव्या भागात प्रदेशबंधाच्या शेष भागाचा विचार केला आहे. यात क्षेत्रप्ररुपणा, स्पर्शनप्ररुपणा, कालप्ररुपणा,अंतरप्ररुपणा, भावप्ररुपणा, अल्पबहुत्वप्ररुपणा, स्वामित्व, वृध्दिबंध, अध्यावसान, समुदाहार व जीवसमुदाहार नामक अधिकाराव्दारे विषयाचे विवेचन केले आहे. येथे सहा खंडांनी युक्त षट्खंडागमाची समाप्ति होते.

**षट्खंडागमावरील टीका-**

दिगंबर मान्यतेनुसार षट्खंडागम हा द्रव्यानुयोगातील एक अत्यंत महत्वाचा ग्रंथ समजला जातो. अशा महत्वपूर्ण ग्रंथावर वेळोवेळी अनेक टीका लिहील्या गेल्या आहेत. यात कुंदकुंदाचार्यकृत परिकर्म, शामकुंडकृत पध्दति, तुम्बुलूराचार्यकृत चूडामणी, समंतभद्रस्वामीकृत टीका आणि बप्पदेवगुरुकृत व्याख्याप्रज्ञाप्ति इत्यादि टीका प्रसिध्द आहेत. या टीकाकारांचा काळ अनुक्रमे इ.स. दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे व सहावे शतक इतका मानला जातो. दुर्भाग्य असे की, या सर्व टीका उपलब्ध नाहीत.षट्खंडागमावर सर्वात महत्वाची ‘धवला’ नावाची टीका आहे. या टीकेचे कर्ते वीरसेन आहेत. त्यांच्या गुरुंचे नाव आर्यनंदी आहे. आदिपुराणकर्ते सुप्रसिध्द जिनसेन आचार्य यांचे शिष्य होते. जिनसेनांनी आपल्या गुरुंच्या सर्वार्थगामिनी नैसर्गिक ज्ञानाची पुष्कळ प्रशंसा केली आहे. वीरसेनांनी बप्पदेवगुरुच्या व्याख्याप्रज्ञाप्ति टीकेच्या आधारे चूर्णि प्रकारची प्राकृत संस्कृत मिश्रित ७२ हजार श्लोकप्रमाण असलेली धवला नावाची टीका लिहिली.

धवला टीकाकाराच्या प्रशस्तीनुसार सन ८१६ मध्ये लिहिली असून ती वाटग्रामपुरामध्ये लिहून समाप्त केली होती. धवला टीकाकर्ते वीरसेन महाविव्दान होते. त्यांनी दिगंबर व श्वेतांबर आचार्याच्या विशाल साहित्याचे अवलोकन केले होते. वीरसेनांच्या टीकेत सत्कर्मप्राभृत, कषायप्राभृत, सन्मतिसूत्र, त्रिलोकप्रज्ञप्तिसूत्र, पंचात्थिपाहुड, गृध्दपिच्छ आचार्यांचे तत्वार्थसूत्र, आचारांग(मूलाचार), पूज्यपादकृत सारसंग्रह, अकलंक रचित तत्वार्थभाष्य जीवसमास , छेदसूत्र,कर्मप्रवाद व दशकर्णीसंग्रह इत्यादि

महत्वपूर्ण सिध्दांत ग्रंथाचा उल्लेख मिळतो. श्वेतांबर संप्रदायमान्य आचारांग, बृहत्कल्पसूत्रगत 'तालपलंब ' सूत्राचा यात उल्लेख करुन यथाशक्ति त्याचे समाधान केले आहे. नागहस्तीच्या उपदेशाला येथे पव्वाइज्जंत व आर्यमंक्षुच्या उपदेशाला अपवाइज्जमाण म्हटले आहे. याव्दारे या दोन्ही महान आचार्यातील मतभेदांचे सूचन केले आहे. स्वतः पंचस्तूपान्वयाचे असल्याचे सांगून विद्यागुरु एलाचार्य, दीक्षागुरु आर्यनंदी व त्यांचे गुरु चंद्रसेन यांचाही उल्लेख केला आहे. विविध ग्रंथ, त्यांचे कर्ते, गुरु-शिष्य परंपरा व सैध्दांतिक ज्ञानाच्या दृष्टीने धवला टीकेची महति फार मोठी आहे.

पाचव्या ज्ञानप्रवादपूर्वातील दहाव्या बाबीतील तिस-या पेज्जदोसपाहुड पासून केला आहे. म्हणूनच कषायप्राभृताला 'पेज्जदोसपाहुड' असेही म्हटले जाते. पेज्ज (प्रेयस्) याचा अर्थ राग व दोषाचा अर्थ व्देष असा होते. हे दोन्ही कषायस्वरुपच आहेत. म्हणून उक्त दोन्ही नावे सारख्या अर्थाचे सूचक आहेत. याचा रचनाकाल विक्रम प्रथम शतकाचा पूर्व मानला जातो. या मूल सिध्दांत ग्रंथाची रचना आ. गणधर (ई.५७ते१५६) यांनी केली.

प्रस्तुत ग्रंथात क्रोधादि कषायांची राग-व्देष-परिणति आणि त्यांची प्रकृति, स्थिति, अनुभाग व प्रदेशगत वैशिष्ट्ये इत्यादींचे स्पष्टीकरण केले आहे. कषायप्राभृताची रचना २३३ गाथा सूत्रांच्यामध्ये केली आहे. ही सूत्रे अत्यंत संक्षिप्त आणि गूढार्थाने युक्त आहेत. गुणधर आचार्यानी कषाय प्राभृताची रचना करुन आचार्य नागहस्ती व आर्यमंक्षु यांना त्यांचे स्पष्टीकरण करविले. त्यांच्याजवळ या ग्रंथाचे अध्ययन करुन आचार्य यतिवृषभांनी जवळपास इ.स. ६व्या शतकात सहा हजार श्लोकप्रमाण असलेल्या चूर्णी-सूत्रांची प्राकृतमध्ये रचना केली. त्यानंतर आचार्य यतिवृषभापासून चूर्णी सूत्रांचे अध्ययन करुन उच्चारणाचार्यांनी त्यावर १२००० श्लोकप्रमाण असलेल्या उच्चारण सूत्रांची विस्तृत रचना केली. उच्चारणार्यांनी ही टीका मात्र अनुपलब्ध आहे. मूल गाथासूत्र व यतिवृषभांच्याचूर्णी सूत्रावरुन वीरसेनांनी सन ८७४ मध्ये २००० श्लोकप्रमाण जयधवला नावाची अधूरी टीका लिहिली. ती त्यांचे शिष्य व राष्ट्रकूट राजा अमोघवर्षांचे गुरु जिनसेनाचार्यांनी (इ. ८०० ते ८४३) मध्ये ४०,००० श्लोकांनी पूर्ण केली. या ग्रंथावर वरीलप्रमाणे अनेक प्रकारच्या टीका लिहिल्या आहेत.

पान न २६१

.

पालन करणे व तीन गुप्तीना धारण करण्याविषयी सांगितले आहे. हिंसादि पाच पापांचा त्याग करणे ही पाच महाव्रते आहेत. महापुरुष ही धारण करु शकतात. कारण ती मूलतःच महान आहेत. अशा प्रकारे संयमाचरणाचे वर्णन करुन कुंदकुंदानी म्हटले आहे की, जो जीव परम श्रध्देने दर्शन,ज्ञान

चारित्र्याला जाणतो तोच त्वरित निर्वाणाला जातो. थोडक्यात चारित्र पाहुडामध्ये मुनिधर्म व श्रावकाचार या दोहोंचीही माहिती मिळते.

**सुत्त पाहुडामध्ये-** एकूण २७ गाथा असून सर्वप्रथम सूत्राची व्याख्या करण्यात आली आहे. ज्याचा अर्थरुप उपदेश अरिहंताकडून सांगण्यात येऊन गणधरांनी ज्याची ग्रंथरचना केली तेच सूत्र होय. या सूत्रांच्या साह्याने साधू पुरुष परमार्थाची प्राप्ति करुन घेतात. संसाराचा नाश करतात. सूत्रसहित सुई सुरक्षित राहते व सूत्ररहित हरवते त्याचप्रमाणेच सूत्राचे अनुकरण करणारा मार्गभ्रष्ट न होता, भवसंसार सहजपणे तरुन जातो. जो आगमादि सूत्रांचा अर्थ जाणून त्यांचे यथायोग्य आचरण करतो तोच रागादिक भाव सोडून शुध्द होऊ शकतो. व्यवहार नयाने मोक्षाला पूरक संवर, निर्जरादि तत्वे गुणकारी असून, अजीव,आश्रव व बंधतत्व ही गुणविरहीत आहेत. याच पाहुडामध्ये मुनि आचारविषयी कथन करताना म्हटले आहे की, महान मुनी सिंहाप्रमाणे निर्भय राहून उत्कृष्ठ चारित्र निर्माण करतात. अनेक प्रकारची व्रते, उपवास यांचे पालन करतात. याउलट जे आगमादि सूत्रांचा अर्थ जाणत नाहीत, स्वच्छंद प्रवृत्तीने राहतात ते पापाची प्राप्ती करतात. पुढील काही गाथामधून मुनींचे नग्नत्व व तिल-तुषमात्र परिग्रहाचा त्याग सांगून स्त्रियांच्या प्रवज्येचा निषेध केला आहे. जिनशासनात तीनच लिंगाचे कथन केले आहे- निर्ग्रंथ साधूचे, श्रावकाचे व आर्यिकांचे याशिवाय अन्यलिंग मोक्षमार्गाला योग्य नाही, वस्त्रधारी मनुष्य तीर्थंकर असला तरी तो सिध्दावस्थेला प्राप्त होऊ शकत नाही. वस्त्ररहित निर्ग्रंथमुद्रा धारण करणारे तीर्थंकरच मोक्ष प्राप्त करतात.

**बोधपाहुडात-** एकूण ६२ गाथा असून त्यात आयतन, चैत्यगृह, प्रतिमा, दर्शन, बिंब, जिनमुद्रा, ज्ञान, देव,तीर्थ,अर्हंत व प्रवज्या या अकरा विषयांचे यथार्थपणे विवेचन केले आहे. पंचमहाव्रतांनी युक्त असलेल्या मुनीलाच खरे आयतन, खरे चैत्यगृह, वंदनीय प्रतिमा, सम्यक्त्वज्ञान संयमाने युक्त मोक्षमार्गाचा दर्शत म्हणून खरे दर्शन, तप व व्रतगुणांनी युक्त म्हणून खरी अर्हंत मुद्रा, त्याच्याच ध्यानयोगयुक्त ज्ञानाला खरे ज्ञान, तोच अर्थ-धर्म-काम प्रव्रज्या देणारा खरा देव होय. या मुनीच्या निर्मलधर्मसम्यक्त्व-संयम-तप ज्ञानाला खरे तीर्थ म्हटले आहे. तसेच जरा व्याधी ,जन्म, मरण, चतुर्गति, गमन, पुण्य,पाप इत्यादि सर्व दोषांचा व कर्मांचा नाश करुन ज्याने आपला आत्मा ज्ञानमय केला आहे तोच अर्हंत होय. ज्याच्यामध्ये घर, परिग्रह, मोहाचा अभाव, २२ परिषह, १६ कषाय यांच्यावर विजय व पापकर्मापासून मुक्तता आढळते तीच खरी दिक्षा होय. या दीक्षामध्ये शत्रु-मित्र, निंदा-प्रशंसा, लाभ-अलाभ, तृण-कांचन इत्यादि बाबीसंबंधी समताभाव असतो. निर्धन-सधन यांच्या घरी समतेने आहार घेतला जातो तीच खरी प्रव्रज्या होय. सर्वात शेवटी आ. कुंदकुंदानी स्वतःला भद्रबाहूचा शिष्य म्हणवून त्यांचा जयजयकार केला आहे. खरोखरच आचारधर्मविषयक गोष्टींचे विवेचन करण्यामध्ये बोध पाहुडाला अधिक महत्व देणे उचित ठरते.

**भावपाहुडाला-** आ.कुंदकुंदानी मंगलाचरणानंतर द्रव्यलिंगी व भावलिंगी श्रमणामधील भेद सांगितला आहे. भावलिंग हे प्रमुख लिंग असून ते परमार्थाला पोषक आहे. द्रव्यलिंगामुळे परमार्थ साधता येत नाही. गुण आणि दोषांचे कारण भाव आहे. भाव शुध्दीसाठी बाह्य परिग्रहाचा त्याग केला जातो. जो अंतर्गत परिग्रहाने युक्त आहे त्याचा बाह्य त्याग निष्फळ आहे. मुनींचा वेष धारण करणे, व्रत, तपांचा अभ्यास करणे, एवढेच नव्हे तर शास्त्रज्ञान प्राप्त करुन घेणे एवढ्यानेच आत्मकल्याण होऊ शकत नाही तर, उलट जेव्हा परिणामांची शुध्दि होईल, रागव्देषादी कषाय नष्ट होतील व आत्मा केवळ आत्मरुपाने रत होईल तेव्हांच आत्मकल्याण संभवते. भावरहित साधू अनेक कोटी जन्मापर्यंत कायोत्सर्गादि करीत वस्त्रांचा त्याग करुन तपाचरण करीत राहिला तरी त्याला सिध्दि मिळत नाही. भावरहित जीवाने नरकादि गतीमध्ये किती तरी दु:ख भोगले आहे. भावरहित जीवांनी अनंत जन्म धारण करुन मातांचे इतके दूध प्राशन केले आहे की, त्यांचे प्रमाण सात समुद्रांच्या पाण्यापेक्षाही अधिक आहे. भावरहित जीवांनी मरण पावून आपल्या मातांना इतके रडविले आहे की, त्यांच्या अश्रूंची तुलना समस्त समुद्रांच्या जलाशी देखील करता येणार नाही. वरील सर्व गोष्टींचे यथायोग्य विवेचन करण्यासाठी बाहुबली,मधुपिंग, बाहुमनि, द्रव्यश्रमण व्दीपायन, श्रमण शिवकुमार यांचे दृष्टांत देऊन मुनिवर्यांना भावशुध्दीसाठी प्रेरित केले आहे. या पाहुडात प्रसंगानुरुप क्रियावादी, अक्रियावादी, अज्ञानी,वैनयिक या पाखंडींचा उल्लेख केला आहे. हे पाहुड साहित्यिक गुणांनी ओतप्रोत भरले आहे. मतिरुपी धनुष्य, श्रुतरुपी दोरी व रत्नत्रयरुपी बाण स्थिर असणा-यांचा परमार्थरुपी वेध कधी चुकत नाही. हे पाहुड एकूण १६४ गाथांनी युक्त आहे.

**लिंगपाहुड-** हे २२ गाथांनी युक्त असून, भावपाहुडाप्रमाणेच लिंगपाहुडाला सर्वज्ञप्रणीत म्हटले आहे. या पाहुडाचे दुसरे नाव श्रमणलिंगपाहुड असे आहे. श्रमणाचा अर्थ मुनि असून मुनींच्या लिंगाविषयी अर्थात वेषाविषयी चर्चा या पाहुडामध्ये करण्यात आली आहे. रत्नत्रयरुपी धर्म हेच खरे लिंग आहे. जे श्रमण लिंग धारण करुन नाचतात, गातात अथवा वाद्य वाजवतात ते श्रमण नसून पापी आहेत. याशिवाय जे संग्रह करुन त्याचे रक्षण करतात, द्यूतामध्ये दंग होतात, विवाह जुळवितात, चोरी लबाडीमध्ये भाग घेतात, भोजनात रसलोलुप राहतात, काम-क्रिडेस प्रवृत्त होतात, प्राणिहत्येची पर्वा करीत नाहीत, स्त्रीवर्गाची करमणूक करतात व इतर क्रियाकर्मामध्ये दुर्लक्ष करतात ते श्रमण अति इ ाानी असले तरी, खरे श्रमण नव्हेत. ते मृत्यूनंतर स्वर्गात न जाता नरक, तिर्यंचामध्ये आत्यंतिक दु:ख भोगतात. ते पशुपेक्षाही निकृष्ट प्रतीचे असतात. शेवटी सर्वज्ञ देवाकडून उपदेशिलेल्या धर्माचे पालन करणे हेच योग्य आहे असे म्हटले आहे. या लिंगपाहुडात ज्या प्रवृत्तीमुळे श्रमणतत्वाची प्राप्ति न होता ते बिघडले जाते अशा गोष्टींची माहिती दिली आहे. हे दोष तत्कालीन साधुवर्गात आढळत असावेत म्हणूनच त्यांना असा उपदेश करण्याची पाळी आली असावी.

**शील पाहुडामध्ये-** एकूण ४४ गाथा आहेत. लिंगपाहुडातील विषयांचे विशेष विवेचन करुन पुढे शीलावर अधिक जोर देण्यात आला आहे. शील आणि ज्ञानामध्ये विरोध नसून सहभाग असल्याचे सांगितले आहे. शीलरहित विषय ज्ञानाला नष्ट करतात. जोपर्यंत जीव विषयासक्त असतो तोपर्यंत तो ज्ञानाला जाणत नाही. आणि उलट ज्ञानाला जाणल्याशिवाय विषयादिपासून मुक्त होऊन पूर्व कर्माचा नाश करु शकत नाही . शीलरहित विशाल ज्ञान निष्फळ आहे, हे सात्यकीपुत्राचा दृष्टांत देऊन सिध्द केले आहे. चरित्ररहित ज्ञान, दर्शनरहित लिंग ग्रहण आणि संयमरहित तप हे सर्व निरर्थक आहेत. ज्ञानरुपी जलानेच जीव शुध्द होतो. शील असेल तरच व्याकरण,छंद,वैशेषिक,व्यवहार व न्यायशास्त्र संबंधीचे ज्ञान सार्थक होईल. शीलाची पूर्ती सम्यग्दर्शनाबरोबरच ज्ञान, ध्यान,योग, विषयविरक्ति व तप यांच्या साधनामुळेच होते. या शीलरुपी जलाने स्नान करणारे शुध्द जीव सिध्द होतात. शीलरहित मनुष्याचा जन्म निरर्थक होय. प्रस्तुत पाहुडामध्ये शीलाचे महत्व विशद करण्याचा यथायोग्य प्रयत्न केलेला दिसतो.

धर्माचरणाचा मुख्य उद्देश मोक्षप्राप्ती हा असून, कुंदकुंदानी मोक्ष पाहुडामध्ये मोक्षाचे विवेचन केले आहे. त्याचे स्वरुप व त्याच्या प्राप्तीची साधने सांगितली आहेत. प्रथमच्या सहा पाहुडावर श्री श्रुतसागर सूरिकृत संस्कृत टीका आहे.

**रयणसार-** आचारधर्माच्या दृष्टीने रयणसार ग्रंथाचे महत्व अन्यन्यसाधारण आहे. यात एकूण १६२ गाथा असून, त्यात श्रावक व मुनींच्या आचाराचे वर्णन केले आहे. यात सम्यक्त्वाला रत्नसार असे म्हटले आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने तथा श्रवणाने मोक्षाची प्राप्ती होत असल्याने सांगितले आहे. सम्यग्दर्शनाविषयीच्या ७० गुणांचा व ४४ दोषांचाही उल्लेख यात केला आहे. गृहस्थासाठी दान आणि पूजा, मुनीसाठी ध्यान व स्वाध्याय आवश्यक सांगितले आहेत. शुभाशुभ भावनांचे वर्णन करुन पुढे गुरु-भक्तीवर अधिक जोर देण्यात आला आहे. भक्तीशिवाय वैराग्य, स्नेहाशिवाय महिलांचे रडणे व वैराग्यरहित त्याग करणे ही तिन्ही विडंबने आहेत. त्यानंतर स्वच्छंदीपणे आचरण करणा-या मुनींची निंदा करुन योग्य आचरण करण्याचा उपदेश दिला आहे. श्लेष्मामध्ये अडकून पडलेली माशी जशी तात्काळ मरते, त्याप्रमाणे परिग्रहाने युक्त असलेला लोभी, अज्ञानी मुनी शेवटी नाशाला कारणीभूत होतो. सर्वात शेवटी गणगच्छाला रत्नत्रयरुप, संघाला नाना गुणरुप संबोधून शुध्दात्म्यालाच संयम म्हटले आहे. रयणसार या ग्रंथाचे अजूनही काळजीपूर्वक असे संपादन होऊ शकले नाही. या गंथ्रात एक दोहा व सहा अपभ्रंश भाषेतील छंद आहेत. ज्याअर्थी या ग्रंथात गणगच्छादिकांचा उल्लेख दिसतो त्याअर्थी हा ग्रंथ कुंदकुंदाचा नसून त्यांच्यानंतरच्या एखाद्या उत्तरकालीन आचार्याने लिहिला असावा असे वाटते.

**मूलाचार-**

आचार धर्माचे विवेचन करणारा मूलाचार हा एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाची रचना आचार्य वट्टकेर यांनी केले आहे. मूलाचारविषयीचा हा एक प्रामाणिक ग्रंथ मानला जातो. मूलाचाराला आचारांग असेही म्हटले आहे. वसुदेवनंदीने यावर टीका लिहिली आहे. श्वेतांबरीय मूलाचारनिर्युक्ती, पिण्ड निर्युक्ति, भत्तपरिण्या व मरणसमाही या ग्रंथाशी यातील ब-याचशा गाथा मिळत्या जुळत्या आहेत. या ग्रंथाचा रचनाकाळ निश्चितपणे सांगता येत नाही, तरीसुध्दा भगवती आराधना ग्रंथाइतकाच तो प्राचीन असावा. या ग्रंथात एकूण १२४३ इतक्या गाथा आहेत. या ग्रंथात मूलगूण, बृहत् प्रत्याखान, संक्षेप प्रत्याखान, सामाचार, व पंचासार, पिंडशुध्दी, षडावश्यक, व्दादशानुप्रेक्षा, अनगार भावना, समयसार, शीलगुणप्रस्तार व पर्याप्ति असे १२ अधिकार आहेत. प्रथम गुणाधिकारात ५ महाव्रते, ५ समिती, ५ इंद्रियाचा निरोध, सहा आवश्यकादि, २८ मूलगूणांचे वर्णन आहे. बृहत्प्रत्याख्यान अधिकारात सर्व पापांचा त्याग करुन दर्शनादि चार आराधनेत स्थिर राहून परीषहावर विजय मिळविण्यास सांगितले आहे. तिस-या संक्षेप प्रत्याख्यानाधिकारात आकस्मिकपणे मृत्यू आला तरी सर्व पाप, कषाय व आहार सोडून देऊन मरणाला सामोरे जाण्याचा उपदेश दिला आहे. सामाचाराधिकारात दहा प्रकारच्या आचारांचे वर्णन असून भिक्षागमन व आर्यिका आचरण सांगितले आहे. पंचाचाराधिकारात दर्शनाचार, ज्ञानाचार या पाच आचारांचे विस्ताराने वर्णन करुन कौटिल्य, आसुरक्ष, महाभारत आणि रामायण इत्यादींचा उल्लेख केला आहे. षडवश्यकामध्ये ६ आवश्यकांचे वर्णन आहे. भावनाधिकात लिंग, व्रत, वस्ती, विहार, भिक्षा,ज्ञान, शरीर, संस्कारत्याग, वाक्य, तप, ध्यानासंबंधी दहा शुध्दीचे पालन करणा-या मुनीला मोक्षाची प्राप्ती सांगितली आहे. व्दादशानुप्रेक्षा अधिकारात अनित्य, अशरणादी १२ अनुप्रेक्षाचे वर्णन आहे. समयसाराधिकारात शास्त्राच्या साराचे विवेचन आहे. प्रर्याप्ति अधिकारात संज्ञा, लक्षण, स्वामित्वादि सहा पर्याप्तींचे सहा पर्याप्तींचे वर्णन केले आहे. शीलगुणाधिकारात १८ हजार शील भेदांचे विवेचन केले आहे. वट्टकेर स्वामीकृत मूलाचार हा ग्रंथ मूलाचाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मानला असून त्यातून ऐतिहासिक गोष्टी तथा प्राचीन ग्रंथाचीही माहिती मिळते.

**भगवती आराधना-** भगवती आराधना हा दिगंबर संप्रदायातील एक प्राचीन ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचे लेखक शिवार्य आहेत. यात सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चरित्र आणि सम्सक्तपया चार आराधनांचे विवेचन केले आहे. प्रामुख्याने मुनिधर्माचे विवेचन करणे हाच या ग्रंथाचा प्रमुख उद्देश आहे. श्वेतांबरीय कल्प, व्यवहार, आचारांग, जीतकल्प या ग्रंथाचा उल्लेख मिळतो. यात एकूण २१६६ गाथा असून हा ग्रंथ ४० अधिकारात विभक्त आहे. या ग्रंथाची भाषा प्राकृत अथवा जैन

शौरसेनी आहे. आगमग्रंथाइतकाच हा ग्रंथ प्राचीन वाटतो. या ग्रंथावर अनेक प्राकृत आणि संस्कृत टीका लिहिल्या गेल्या आहेत.

प्रस्तुत ग्रंथात प्रारंभी १७ प्रकारची मरणे सांगितली आहेत. लिंग अधिकारात आचेलक्य, लोच, देहममत्वाचा त्याग, मयूरपिंछी धारण करणे ही निर्ग्रंथाची लिंगे सांगितली आहेत. केशलोच यात श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. पुढे सल्लेखनाचे वर्णन केले आहे.

**रत्नकरण्ड-श्रावकाचार**

श्रावकाचाराविषयीचे संस्कृत ग्रंथ-

श्रावक आचाराचे व्यवस्थितरीत्या वर्णन करणारा हा एक अत्यंत महत्वपूर्ण असा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा कर्ता कोण असावा याविषयी मात्र बराच मतभेद आहे. टीकाकार प्रभाचंद्राने हा ग्रंथ समंतभद्रांनी लिहिल्याचे म्हटले आहे. उलट वादिराजकृत पार्श्वनाथ चरित्राच्या उत्थानिकेत याचा कर्ता समंतभद्रापेक्षा वेगळा असून तो योगिंद्र असल्याचा उल्लेख आहे. काहींच्या मते यांच्यापेक्षाही दिली जाते. हा ग्रंथ पाच परिच्छेदात विभक्त असून, त्यात एकूण १५० इतकी श्लोकसंख्या आहे. प्रथम परिच्छेदात धर्माचे स्वरुप कथन करुन सम्यग्दर्शनाचे महत्व प्रगट केले आहे. दुस-या परिच्छेदात सम्यग्ज्ञानाचे वर्णन असून तिस-यात पाच गुणव्रते यांचे वर्णन आहे. चौथ्या परिच्छेदात चार शिक्षाव्रतांचे वर्णन असून पाचव्या परिच्छेदात संल्लेखनेसह ११ प्रतिमांचे विस्तृत विवेचन केले आहे. कुंदकुंदाच्या चारित्र पाहुडाप्रमाणेच सल्लेखनेचा श्रावकाच्या व्रतामध्ये समावेश करण्यात आला आहे. या ग्रंथावर प्रभाचंद्रविरचित एक संक्षिप्त संस्कृत टीका आहे. या टीका आहे. या टीकेबरोबरच मूल ग्रंथाचे प्रकाशन दि. जैन ग्रंथमाला मुंबई व्दारा झाले आहे.

**यशस्तिलकचंपू-**

प्रस्तुत ग्रंथ आ. सोमदेव यांनी लिहिला असून, त्यांचा काळ इ. ९४३ ते ९६८ इतका मानला जातो. या ग्रंथात यशोधरचरित्र कथन केले असून, संस्कृत भाषेतील हा एक चंपूग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचे विभाजन आश्वासामध्ये केले असून ५ ते ८ आश्वासामध्ये चारित्राचे वर्णन आहे. विशेषतः ७ ते ८ आश्वासामध्ये श्रावकांच्या १२ व्रतांचे सविस्तर वर्णन केले आहे. भाषाशैली प्रौढ असून या ग्रंथाची समाप्ति ९५६ मध्येच झाली असावी. हा ग्रंथ काव्य अलंकारादि दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. या ग्रंथात काही ठिकाणी शिथिलाचार पोषक गोष्टींचे कथन करण्यात आले आहे. यावरुन हा ग्रंथ आचार्य सोमदेवांचा नसावा असे मानण्यात येते.

**श्रावकाचार-**

श्रावकाचार ग्रंथाची रचना अमितगति यांनी केली असून या ग्रंथाचा रचनाकाल सुमारे इ.स. १००० इतका मानला जातो. हा ग्रंथ जवळ जवळ १५०० संस्कृत श्लोकांनी परिपूर्ण असून, या ग्रंथाचे

विभाजन एकूण १५ अध्यायामध्ये करण्यात आले आहे. या ग्रंथात प्रथम, धर्माचे स्वरुप, मिथ्यात्व व सम्यक्त्व यातील विशेष फरक,सात तत्वे, अष्टमूलगुण, १२ व्रते, त्यांचे अतिचार, सामायिकादि सहा आवश्यके, दान, पूजा व उपवास यांचे वर्णन करुन नंतर १२ भावनांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. या ग्रंथातील शेवटच्या अध्यायातील १४४ श्लोकामधून ध्यानाचे वर्णन करण्यात आले आहे. त्यात ध्यान, ध्याता आणि ध्येय व ध्यानफल यांचे विवेचन आहे. स्वतः लेखकाने आपल्या अनेक ग्रंथामधून ग्रंथाच्या रचनाकालाविषयी माहिती दिली आहे.

**सागरधर्मामृत-**

या ग्रंथाची रचना पं आशाधर यांनी केली असून श्रावकाचारविषयीचा हा एक ग्रंथ आहे. या ग्रंथकर्त्याचा काळ सुमारे इ.स. ११७३ ते १२४३ इतका मानण्यात येतो. या ग्रंथाची रचना संस्कृत श्लोकबध्द असून, श्रावकाचाराचे यात विस्तृत वर्णन करण्यात आले आहे. यात एकूण आठ अध्याय आणि ४७७ इतके श्लोक आहेत. या आठ अध्यायाव्दारे श्रावकधर्माचे सामान्य वर्णन, अष्टमूलगूण व ११ प्रतिमांचे वर्णन केले आहे. शेवटच्या आठव्या अध्यायातील ११० श्लोकाव्दारे समाधिमरणाचे स्वरुप विस्तृतपणे कथन केले आहे. या ग्रंथाची रचना काव्यमय असून यावर स्वोपज्ञ टीका आहे.